# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०८-०१-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक ०८ जानेवारी २०१८ रोजी (का.प.क्र. ०४ दि.२६.१२.२०१७ रोजीची पुढे ढकललेली) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३५ वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.अतिरीक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २२. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २५. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २७. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २८. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २९. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |

| | |
|---|---|
| ३०. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३२. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३३. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३४. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३५. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३६. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३७. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३८. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३९. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ४०. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ४१. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४२. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४३. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४४. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४५. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४६. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४७. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४८. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४९. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ५०. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ५१. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५२. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५३. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५४. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५५. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५७. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५८. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५९. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६०. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ६१. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६२. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६३. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६४. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६५. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६६. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६७. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६८. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |

| | |
|---|---|
| ६९. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७०. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ७१. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७२. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७३. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७४. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७५. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७६. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७७. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७८. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७९. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८०. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८१. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८२. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८३. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८४. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८५. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८६. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८७. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८८. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८९. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९०. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन

मा.महापौर :आजच्या बैठकीसाठी मा.आयुक्त उपस्थित नाही. स्मार्ट सिटीच्या बैठकीसाठी गेलेले आहे. तसे लेखी त्यांनी कळविलेले आहे. आयुक्त म्हणुन श्री.श्रीकृष्ण भालसिंग हे आयुक्त म्हणून काम पाहतील.

श्री.गजानन बारवाल :स.जेष्ठ पत्रकार श्री भालचंद्र देशपांडे यांचे दु:खद निधन झाले आहे. त्यांना सभागृहा तर्फे श्रध्दांजली देण्याचा प्रस्ताव ठेवतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :स.सदस्यांनी जो प्रस्ताव मांडला त्याला माझे अनुमोदन आहे. त्याचप्रमाणे भिमा-कोरेगावमध्ये जी दंगल उसळली होती. त्यामध्ये राम पंडागळे नावाच्या एका तरुण युवकाचा मृत्यु झाला आहे. त्याला पण सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी.

मा.महापौर :भिमा कोरेगाव येथील राम पंडागळे यांचे निधन झाले, आणि पत्रकार भालचंद्र देशपांडे यांचे निधन झाले. तसेच जेष्ठ गायिका आंद्रलता काळगिळकर त्यांचे निधन झाले आहे. यांना सभागृहाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. सर्वानी श्रध्दांजली

साठी उभे रहावे. (यावेळी स्व.राम पंडागळे स्व.भालचंद्र देशपांडे जेष्ठ गायीका आंद्रलता काळगिळकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.त्र्यंबक तुपे :शहरामध्ये कुत्र्यांची संख्या वाढली आहे. अनेक ठिकाणी लहान मुलांचा कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे वृत्तमानपत्रामध्ये सुध्दा आले आहे. याबाबत महापालिकेच्या वतीने प्रशासनाने काय काय उपाय केले? कारवाई केली? काय नियोजन आहे?

श्री.अफसर खान :पुर्ण शहरामध्ये कुत्र्यांच्या बाबतीत चर्चा चालु आहे. हे काम कोण पाहते, बेगमपुरामध्ये, जयसिंगपुरामध्ये, कुतूबपुरामध्ये, विद्यापीठ परिसरामध्ये कुत्र्यांची संख्या जास्त वाढली आहे. यामध्ये संबंधीत विभाग काहीच काम करत नाही. कुत्रे पकडण्याची गाडी सुध्दा येत नाही. याच्यावर ठोस निर्णय घेण्यात यावा. हा विभाग काम करीत नसेल तर दुसऱ्याला देण्यात यावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर:कुत्र्यांचा विषय खुप गंभीर आहे. लहान मुलांना शाळेत जाणे कठीण झाले. रात्री काम करुन येणाऱ्या लोकांचा पण प्रश्न निर्माण झाला आहे. गाडीला फोन केला की गाडी येते पण गाडी आल्यावर कुत्रे पळुन जातात, याच्यावर ठोस पर्याय काय? शहरामध्ये कचऱ्याचे ढिग खुप वाढले, त्यामुळे जास्त कुत्रे संख्या वाढली. रात्री कुत्रे पकडल्या जावेत. परंतू अद्याप काही कार्यवाही झालेली नाही.

श्रीमती.किर्ती शिंदे :शहरामध्ये, लहान मुलांना कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे. शहरामध्ये एकच कुत्र्याची गाडी आणि दोन चार कर्मचारी असतात. त्यातले पण काही गैरहजर असतात. याच्यावर ठोस निर्णय घेण्यात यावा आणि कुत्रे पकडण्याच्या गाड्यांची संख्या वाढवली पाहिजे. अनेक नागरीकांना मोकाट कुत्रे चावा घेत आहे.

श्री.इरशाद खान :जी बातमी वृत्तमानपत्रामध्ये आली आहे, ती वार्ड क्र.४१ मधली आहे. त्यामध्ये आकरा शाळकरी मुलांना कुत्र्यांनी चावा घेतला, फोन केला असता कर्मचारी घरी गेले होते. कुत्र्यांची गाडी दिवसा येते. कर्मचारी त्याचे मागे लागतात ते धावत जातांना नागरीकांच्या अंगावर पण येऊन चावा घेऊ शकतात. तर ती गाडी दिवसा न येता रात्री दहा ते दोन वाजता आणि सकाळी सहा ते नऊ वाजेपर्यंत कुत्रे पकडण्याची वेळ असावी. असे केल्यास कुत्रे पकडण्यासाठी जास्त त्रास होणार नाही.

श्री.मलके गोकुलसिंग :वार्ड क्र.३५ मध्ये मागच्या महिन्यात अशी घटना घडली की, घरातुन सात वर्षाच्या मुलाला कुत्रे ओडुन बाहेर नेत होते. कचरा डेपु जवळ असल्यामुळे जास्त कुत्रे नारेगावमध्ये असतात. नारेगावसाठी विशेष नियोजन करण्यात यावे.

श्रीमती.संगिता वाघुले :कुत्र्यांच्या विषयाबाबत श्री.नाईकवाडे साहेबांना वारंवार फोन करुन सांगितले आहे. सनी सेंटरच्या डीपी रोड जवळ २५-२५ कुत्र्यांचे टोळके असते. यासंदर्भात ज्यावेळेस कुत्र्याच्या व्हॅनसाठी फोन केला तर ते येतात, चार पाच कुत्रे धरले की, आमच्या कडच्या जाळ्या

संपलेल्या आहेत, असे सांगतात. पिसादेवीचा जो रस्ता आहे, आंबेडकर नगर येथील शाळकरी मुले कुत्र्याच्या भितीने चुकीच्या वाटेने येत असतात. माझा कडे फोटो आहे ते दाखविते.

श्री.नासेर सिद्दीकी :काही दिवसापुर्वी वार्ड क्र.२५ मध्ये आठ मुलांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. तसेच एका गाईचे लचके कुत्र्यांनी तोडले होते. त्याचवेळेस अधिकारी यांना फोन केला तर ते सांगता की, पुण्यावरुन मॅडम येणार, शासनाची पकडण्यास मनाई आहे असे सांगतात. जास्त कुत्रे कचऱ्याकुड्याच्या जागेवरच असतात. तेथे जाऊन पकडले पाहिजे. यामुळे मुलांना नागरिकांना मोठा त्रास होतो आहे. रात्रीच्या वेळी कुत्रे पकडण्याचे नियोजन करावे.

श्री.विकास जैन :शहरामध्ये जे चालु आहे त्याबाबत अधिकाऱ्यांना माहिती आहे का?

श्री.गंगाधर ढगे :कुत्रा चावल्या नंतर जेवढे आरोग्य केंद्र असतील तेथे लवकरात लवकर नागरीकांना लस देण्यात यावी. जेणे करुन कुत्रा चावल्यामुळे शरीरात विष जाणार नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :एकुण कर्मचारी या विभागात किती आहेत? कुत्रे पकडण्यासाठी लागणाऱ्या गाड्या किती? काय योजना करता येईल? ते सांगण्यात यावे. जाळ्या टाकुन पकडण्याची नवीन पध्दत आली आहे, ति टाकत असतांना कुत्रे त्यांच्यातुन पण काही सेकंदामध्ये पळुन जातात. पिसाळलेल्या कुत्र्यांनी फक्त लहान मुलांनाच नाही तर, रात्री उशीरा येणाऱ्या लोकांना सुध्दा खुप चावा घेत आहे. अधिकारी सांगता की पकडुन त्यावर उपाय करुन पुन्हा सोडावे लागते. कायद्यात काही दुरुस्ती करता येते का? तसा सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन शासनाला पाठवण्यात यावे.

श्रीमती.सुरेखा सानप :वार्ड क्र.३६ मध्ये एका व्यक्तीला पिसाळलेला कुत्रा चावला होता. त्याबाबत फोन केला तर, जेवण करत आहोत. असे उत्तर दिले. नारेगावात कचरा डेपो आहे. त्यामुळे जास्त कुत्र्यांची संख्या आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :माझ्या वार्डात तीस वर्षाच्या व्यक्तीचा कुत्रा चावल्यामुळे मृत्यु झाला होता. तसेच साई नगरमध्ये एका छोट्या मुलाची मान कुत्र्यानी पकडली होती. मी मुद्दा उपस्थित केला होता, २००७ पासुन नसबंदी चालु असुन कुत्र्यांची संख्या का वाढत आहे? लोक घाटीत जातात तेथे मेडीकल नसते. कुत्र्यांमुळे शाळेतुन आल्यावर मुले खेळायला जात नाही. मनपाकडे किती मेडीसीन्स स्टॉक आहे. सर्व खुलासा करावा.

श्री.कैलास गायकवाड :कुत्र्यामुळे सर्व नागरीक त्रस्त आहे. २००७ ला नसबंदीचा कायदा लोकसभेमध्ये झाला. कुत्र्यांची नसबंदी करण्यात संदर्भातमध्ये महानगरपालिका कुठेतरी कमी पडत आहे. नसबंदी केली जात नाही म्हणुन संख्या वाढत आहे. जो कायदा झाला त्यात काही बदल करता येतो का? तसा या सभागृहातर्फे एक ठराव पारित करुन तो राज्य शासनामार्फत केंद्र शासनाला कसा पाठवता येईल? यासाठी

प्रयत्न केला पाहिजे. कुत्रा चावल्यावर दवाखान्यामध्ये इंजेक्शन उपलब्ध नसतात. योग्य उपाय योजना झाली पाहिजे.

श्रीमती.विमल केंद्रे :वार्ड क्र.९६ मध्ये संत गाडगेबाबा उद्यानासमोर २०-२५ कुत्रे जमा होतात. रात्री कुत्रे भुकत असल्यामुळे नागरीकांना त्याचा खुप त्रास होत आहे. आणि एक महिन्यापासुन लाईट नसल्यामुळे तीन ठिकाणी चोरी सुध्दा झालेली आहे. एक महीन्यापासुन लाईट बंद आहे. श्री.गाडेकर नावाचा ठेकेदार सांगतो की, कालावधी संपलेला आहे, मी लाईट लावु शकत नाही. लाईट व्यवस्था करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :एकच गाडी कुत्रे पकडण्याची आहे. श्री.शाहिद आणि श्री.डोंगरे नावाचे दोन कर्मचारी यामध्ये गाड्यांची संख्या वाढवण्यात यावी आणि चार पाच कर्मचारी पण देण्यात यावे. डॉगव्हॅन सतत फिरत असावी. नसबंदी संदर्भात शस्त्रक्रिया होतात का? कुठली औषधी वापरली जातात? यासगळ्या यंत्रणेवर control ठेवणारी कुठलीही यंत्रणा महापालिकेत नाही. मा.खासदार यांच्या मार्फत कायद्यात काही दुरुस्ती करता आली तर तसे शिफारस पत्र घेऊन शासनाकडे पाठपुरावा करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहरामध्ये कुत्र्याची संख्या वाढलेली दिसुन येत आहे. त्यामध्ये काही कुत्रे भुकणारे चावणारे, काही कुत्रे पिसाळलेले आहेत. यासंदर्भात अधिकाऱ्याला फोन केला तर त्यांचे उत्तर असते की, कुत्रा पिसाळलेला आहे का? मग कुत्रा चावल्यानंतर पकडणार आहोत का? आधी कुत्रे एकटे-एकटे फिरत होते. आता २५-२५ कुत्रे एकत्र फिरत आहेत. प्रभाग वाईज उपाय योजना करावी. कोणते कुत्रे पकडायचे कायद्याची नियमावली काय आहे? ती सभागृहासमोर यावी. कुत्रा चावल्यानंतर जी लस देण्यात येते, ती लस महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये उपलब्ध नाही. यासगळ्या गोष्टींवर गंभीरपणे विचार केला पाहिजे. आणि कुत्रा चावल्यानंतरची लस उपलब्ध करुन दिली पाहिजे. तसे सुचना कराव्या, नसबंदी ही १००% सक्षेस झाली पाहिजे. तशी कार्यवाही व्हावी.

श्री.मो.अय्युब जागीरदार :रहेमानिया कॉलनीत एकाच रात्री तब्बल १८ मुलांचे लचके मोकाट कुत्र्यांनी तोडले होते. घाटी व एमजीएम मध्ये ॲडमीट आहे. एका मुलास मोठी जखम झाली. कुत्र्यांना पकडण्याची मागणी श्री.नाईकवाडे यांना केली. त्यांनी सांगितले की, Animal welfare board च्या नियमानुसार कुत्र्यांना पकडु नाही शकत आणि मारु पण नाही शकत. परंतु कायदा असे सांगतो की, कुत्रे पकडुन नसबंदी करुन सोडुन द्यावे. शहरातल्या किती कुत्र्यांची नसबंदी केली आणि किती ना सोडुन देण्यात आले? कुत्रे एका वार्डातुन दुसऱ्या वार्डात जातात. नसबंदी मुळे आणखी ताकद वाढते व वाटेल त्याला ते चावतात. रात्रीच्या वेळी चावण्याचे प्रमाण जास्त आहे. नऊ झोनमध्ये एक एक गाडी देण्यात यावी. स्वतंत्र विभाग करावा रात्रीच्या वेळी कुत्रे पकडावे. आझाद चौक, सेंट्रल नाका येथे मच्छी

मार्केट असल्यामुळे तेथे जास्त कुत्रे असतात. कुत्रे पकडण्यासाठी रात्रीच्या वेळेस कार्यवाही केली पाहिजे. कुत्रे चावल्यानंतर जी लस दयावी लागते ती घाटी रुग्णालयात लस पुरवण्यात यावी. मच्छी मार्केटची सर्व घाण नाक्याच्या बाजुला कचरा कुंडीवर आणुन टाकतात. त्यामुळे तेथे १०० ते १५० कुत्रे टोळके करुन असतात.

श्रीमती.माधुरी देशमुख :कुत्रे पकडल्यानंतर त्यांचे काय केले जाते? एका वार्डातले कुत्रे पकडले की ते दुसऱ्या वार्डात सोडुन देतात. कुत्र्यांची गनना झाली आहे का? केलेली नसेल तर ती करण्यात यावी. जेव्हा शस्त्रक्रिया केली जाते तेव्हा लसीकरण केले पाहिजे. ज्याचे लसीकरण केले त्यांच्या गळ्यात बेल्ट घालण्यात यावे. त्या बेल्ट वर शस्त्रक्रिय झाल्याची दिनांक, कोणते लसीकरण केले ती नोंद, आणि नंतरची लसीकरणाची दिनांक त्या बेल्टवर टाकण्यात यावी. लसीकरण व बेल्टसाठी कंपनीची मदत घ्यावी. Dog Van च्या वेळेत सायंकाळी ८ ते सकाळी ७ वा. दरम्यान कुत्रे पकडावे. त्यांच्या वेळेत बदल करण्यात यावी आणि ती Mobile Dog Van असावी. डॉग व्हॅन फिरते असावे, कर्मचारी यांना प्रशिक्षण द्यावे.

श्री.राजु शिंदे :जेवढे कुत्रे ११५ वार्डामध्ये असतील त्या कितीतरी पटीने नारेगाव, ब्रिजवाडी आणि एमआयडीसीमध्ये आहेत. याभागातील रस्त्यावर कोणताही कर्मचारी किंवा कोणताही नगरसेवक रात्री सातच्या नंतर दुचाकी किंवा पायी जाऊन दाखवावे त्याला मी ५१ हजारांचे बक्षीस देईल. त्या भागामध्ये कुत्र्यांची दहशत खुप वाढली आहे. फोन केल्यावर सुध्दा गाडी वेळेवर येत नाही. लवकर उपाय योजना केली पाहिजे. गाडी नाही कर्मचारी असे उत्तरे देतात. कुत्रे पकडले तरी ते घेऊन जाऊ शकत नाही अशी त्या विभागाच्या कर्मचारी यांची स्थीती आहे. कुत्र्यांच्या बरोबरच डुक्करांची संख्या पण फार वाढलेली आहे. डुक्करांच्याबाबतीत विभागाला पत्र सुध्दा दिलेले आहे. नसबंदी केली जात नाही. ॲनिमल संघटना आहे त्यामुळे जबाबदारी घ्यावी. सफारी पार्क जवळ १०० एक्कर जागा आहे तेथे व्यवस्था करावी.पण यासंदर्भात काहीच कार्यवाही होत नाही. जस म्हशी आणि गाईच्या कानाला batch लावला जात असे, तसेच कुत्र्यांच्याबाबतीत का करत नाही? यांच्याकडुन काम होत नसेल तर एखाद्या सक्षम अधिकारी किंवा एखाद्या एजन्सीला हे काम देण्यात यावे. त्यांनी पकडुन त्याची व्यवस्था केली पाहिजे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी :कुत्र्यांच्या बाबतीत Dog Van चा एक ठराविक दिवस वेळ ठरवण्यात यावी.

श्रीमती.शेख नरगीस :वार्ड क्र.२६ नेहरु नगर, कटकट गेटभागात दिवसा मोकाट कुत्रे दिसुन येते. दोन महिन्या अगोदर कुत्रे पकडुन नेले होते. आता परत कुत्रे दिसुन येत आहे.

श्रीमती अर्चना निळकंठ :वार्ड क्र.९९ मध्ये आता पर्यंत आडिच वर्षाच्या काळामध्ये dog van एकदाच आलेली आहे. मॉर्निंग वाकच्या वेळेस लोकांच्या मागे कुत्रे लागतात. याबाबतीत वारंवार सांगुन सुध्दा गाडी येत नाही.

श्रीमती शेख समिना :सर्वसाधारण सभेत जेव्हा कुत्र्यांवर चर्चा होत असते, त्याच्यावर अद्याप काहीच कार्यवाही केलेली नाही. ज्या अधिकाऱ्यांना चार्ज दिला, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

श्रीमती शोभा बुरांडे :कुत्रे पकडण्यासाठी फोन केला तर सांगतात की, कुत्रा पिसाळलेला आहे का? जखम झाली आहे का? तरच आम्ही येतो. आता पर्यंत एक दोन वेळेसच गाडी आलेली आहे.

श्री.बन्सी जाधव :नुकताच दोन दिवसापुर्वी म्हसोबा नगर परिसरातील संस्कार विद्यालयाच्या चार मुलांना कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे.

श्रीमती ज्योती पिंजरकर :एका गाडीखाली कुत्रा आला. त्यास उचलण्यास फोन केला तर, ते पैसे देणार असेल तरच आम्ही येऊ असे सांगतात.

श्री.प्रमोद राठोड :जेव्हा श्री.नाईकवाडे यांना फोन केल्यानंतर गाडी नाही, कर्मचारी नाही अशा अडचणी सांगतात, नऊ झोनमध्ये नऊ डॉग व्हॅन उपलब्ध असाव्यात.

मा.महापौर :रहेमानिया कॉलनीमध्ये जो झालेला प्रकार आहे, पिसाळलेले आणि मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला, आताच श्री.बन्सी जाधव यांच्या भागात चार शाळेच्या मुलांना चावा घेतला, असे अनेक ठिकाणी प्रश्न उपस्थित झाले. कर्मचाऱ्यांची संख्या, dog van नाही. अधिकाऱ्याचा प्रतिसाद मिळत नाही. बेजबाबदार पणे विभागाचे काम चालू आहे. मच्छी मार्केटचा प्रश्न मार्गी लागला नाही. श्रीमती वाघुले ताई यांच्या वार्डातील लाईटचा प्रश्न श्री.देशमुख यांनी लवकर सोडवावा. नारेगाव, ब्रिजवाडी या भागात, कचऱ्यामुळे कुत्र्यांची संख्या वाढली, कुत्र्यावर नसबंदी असेल, शस्त्रक्रिया, लसीकरण असेल, त्यासाठी २४ तास रुग्णालय चालु असायला पाहिजेत. त्या करता सुध्दा उपाय योजना करावी. नऊ प्रभागामध्ये नऊ व्हॅन ठेवता येईल का? ते पहावे. केंद्र शासनाकडुन काही करावे लागत असेल तर निश्चितच मा.खासदार साहेबांकडुन त्याकरिता प्रयत्न करण्यात येईल. या कामाकरिता निधी कमी पडणार नाही. डुक्करांचा प्रश्न आहे, तो पण सोडवण्यात यावा. जे सगळे मुद्दे उपस्थित झाले, त्याचा खुलासा देण्यात यावा.

श्री.सचिन खैरे :विद्युत कॉलनी, कला हौसीग, इब्राहिम चौक येथे ही डुक्करांचे आणि कुत्र्यांचे प्रमाण खुप वाढले आहे.

पशुसंवर्धन अधिकारी :वार्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनीमध्ये रात्री ७ वाजता ९ मुलांना कुत्र्यांनी चावा घेतला होता. त्यावेळेस पथकातील कर्मचारी घरी गेले होते. त्यातील दोन कर्मचाऱ्यांना बोलावून वार्डामध्ये पाठवण्यात आले. तोपर्यंत नागरीकांनी त्या कुत्र्याला मारुन आमच्या ताब्यात दिले. दुसऱ्यादिवशी त्या परिसरात जाऊन आकरा कुत्रे पकडण्यात आले होते. स.श्री.तुपे यांच्या वार्डात पण पथक पाठवण्यात आले तेथुन

पाच कुत्रे पकडण्यात आले. मला फोन आल्यानंतर शाहेद किंवा डोंगरे हे कर्मचारी पाठवलेले आहे. यापुर्वी निर्णय झाला की, प्रत्येक वार्डामध्ये गाडी आणि कर्मचारी ठेवावे. तो प्रस्ताव त्या त्या विभागाला पाठवुन त्याचा पाठपुरावा करुन ते झालेले नाही. प्रत्येक वार्ड निहाय गाडी आणि कर्मचारी ठेवणे आवश्यक आहे. कुत्र्यांची संख्या ४०,००० पेक्षा जास्त आहे. आज स्थितीला कर्मचारी नऊ आणि दोन गाड्या आहेत. वाहनांची संख्या मर्यादित आहे. पाच कर्मचारी वयोवृध्द आहेत. त्यामध्ये महाराणा सेक्युरिटीचे नऊ कर्मचारी आऊटसोर्सिंगवर घेतले होते. तीन कर्मचारी पुण्याला ट्रेनिंगला पाठवलेले आहेत.

श्री.राजु शिंदे :टेकनिकल, नॉन टेकनिकल ते कर्मचारी आहेत की नाही, याची शहानिशा कोण करते? एजन्सीला काम कशा पध्दतीने दिले, टेंडर कसे काढले होते.

मा.महापौर :कोणते स्ट्रक्चर शेडयुल मंजुर केले? आणि कशा पध्दतीने एजन्सीकडुन काम घेत आहोत? किती पेमेंट एजन्सीला होत आहे? त्याची एक टिप्पणी सभागृहासमोर देण्यात यावी.

पशुसंवर्धन अधिकारी :Animal welfare board च्या हेल्थ ऑफिसर यांची सप्टेंबरमध्ये मिटिंग घेण्यात आली होती. मनपाची जी कुत्रे पकडण्याची पध्दत आहे, त्याच्यावर त्यांनी आक्षेप घेतले. आणि सुचना दिलेल्या होत्या की, सरसगट कुत्रे पकडण्याचे काम बंद करण्यात यावे. तक्रारीच्याच ठिकाणचे कुत्रे पकडण्यात यावे. त्याचे लसीकरण, शस्त्रक्रिया करुन त्याच ठिकाणी परत सोडण्यात यावे. चार वेळेस Animal welfare board च्या नियमानुसार पात्र संस्था मिळण्यासाठी टेंडर काढण्यात आले. नियमाप्रमाणे ते कुत्रे कसे पकडले, कुठे पकडले, कुठे सोडले त्याची पुर्ण नोंद सुध्दा ठेवायची आहे. त्यामुळे ह्या टेंडरमध्ये कोणत्याही संस्थेने प्रतिसाद दिला नाही. आठ दिवसा नंतर पकडलेले कुत्रे जर पिसाळलेले होत असेल तर टेकनिकल कमिटीच्या म्हणण्या प्रमाणे इंजेक्शन देऊन मारण्यात यावे. त्या अनुशंगाने, ऑपरेशन थेटर दुरुस्ती करणे, कोंडवाडा दुरुस्ती करणे, यासाठी मा.आयुक्तांनी बांधकाम विभागाला सुचना दिला होत्या. पकडलेले कुत्रे ठेवण्यासाठी दहा लाख रुपये खर्च करुन वॉल कम्पाऊंड उभारण्याचा प्रस्ताव पडून आहे. पाच कर्मचारी पुण्याला ट्रेनिंगसाठी पाठवले होते. तेथे ब्ल्यु क्रॉस संस्थेकडे जाऊन पाहणी केली. तेथे चांगल्या प्रकारे कुत्रे पकडण्याचे नियोजन केलेला आहे. तीन एक्कर वर त्यांनी कुत्र्यांचे सेंटर काढले. मा.महापौरांशी यासंदर्भात चर्चा झाली. त्या संस्थेला बोलवून घेण्याच्या सुचना दिल्या होत्या.

मा.महापौर :लोकांचा मृत्यु होतो तरी कुत्रे पकडु शकत नाही. काही वेळेस नियमाच्या बाहेर जाऊन काम करावे लागेल. नागरीकांच्या सुरक्षतेच्या दृष्टिने काम करावे लागेल. नियमाच्या चौकटीत राहुन काम करत असतील तर एक पण कुत्रा पकडु शकणार नाही. आणि

त्याचा आधार घेऊन कामामध्ये अतिशय निष्काळजी पणा सुरु आहे. हे योग्य नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :पिसाळलेले कुत्रे कसे ओळखायचे?

पशुसंवर्धन अधिकारी :आठ दिवस अंडर ऑफजरवेशनमध्ये ठेवायच आणि त्याची एक टेकनिकल कमिटी आहे, शासनाने एक अधिकारी नेमलेला आहे, दोन असिसंटन्ट आहे ते ठरवतात की, तो पिसाळलेला आहे की नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :महापालिकेमध्ये ९९% कर्मचारी सेक्युरिटीच्या माध्यमातुन घ्यावे लागेल. टेकनिकलच्या माध्यमातुन जी लोक घेतले जातात त्या ठिकाणी हे कर्मचारी चांगले काम करतात. जसे मुंबईला श्री.नितीन साळवे गेले होते, त्याठिकाणी छोटी छोटी व्हॅन आहे. तेथील औषधी सुध्दा नियमबाद्य होती. शहरात पिसाळलेल्या कुत्र्यांची संख्याच जास्त झालेली आहे. वार्डामध्ये जनजागृतीचे काम सदस्यांना सुध्दा करावे लागणार आहे. जवाहर कॉलनीमध्ये एकुण किती नागरिकांना कुत्रे चावले याचा रेकॉर्ड आहे का?

पशुसंवर्धन अधिकारी :मागच्या महिन्यामध्ये घाटीमधुन २१७ ची नोंद दिलेली आहे. त्यातले सगळेच मनपाच्या हाद्दीतले नाहीत काही बाहेरचे पण आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे :शहरामध्ये नागरिकाला कुत्र्यामुळे त्रास होतो, कुत्रा चावल्या नंतर प्रथम उपचार देणे मनपाचे काम आहे. सातारा परिसरमध्ये पकडलेले कुत्रे ठेवण्यासाठी त्यांना लसीकरण करण्यासाठी काही जागा घेतलेली होती का?

पशुसंवर्धन अधिकारी :जागा घेण्याचा निर्णय झालेला आहे, पण अमलबजावणी झालेली नाही. प्रत्येक वार्डामध्ये वाहने आणि कर्मचारी देता येईल. असा ठराव घेतला.

श्री.त्र्यंबक तुपे :जागा घेणे बाबत दहा लाखाला मंजुरी मिळालेली नाही, म्हणुन कुत्रे पकडण्याचे काम थांबलेले आहे. ती फाईल कुठे? यासंदर्भात मा.महापौरांना मा.आयुक्तांना चर्चा केली होती का? पाठपुरावा करुन ती संचीका मंजुर करुन घ्यावी.

मा.महापौर :आजच फाईलवर मा.आयुक्तांची सही घ्यावी, उपलब्ध ठेकेदाराकडुन काम करुन घ्यावे. काम सुरु करण्यात यावे.

श्री.दिलीप थोरात :महानगरपालिकेच्या वतीने मा. उच्च न्यायालय मा.सर्वोच्च न्यायालयात जाऊन जो काही कायदा केला, नियम केले याच्यामध्ये हस्तक्षेप करुन या नियमात बदल करुन किंवा महानगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाला वेगळे अधिकार देऊन यातुन चांगला निर्णय व मार्ग निघु शकतो का? त्यांचा विचार केला पाहिजे.

श्रीमती सुरेखा सानप :२९ नोव्हेंबर रोजी कुत्रे पकडण्यासाठी फोन केला. चार्ज माझ्याकडे नाही. सांगता आता यांच्याकडे चार्ज कसा आला?

पशुसंवर्धन अधिकारी :यासंदर्भात १६ तारखेला मिटिंग ठेवलेली आहे. ब्ल्यु क्रॉस संस्थेला बोलावुन घेतले आहे. चर्चा करुन योग्य निर्णय घेतला जाईल.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :गांभीर्याने विचार करा व संस्थेला लगेच बोलावून चर्चा करावी. मार्ग काढावा. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :या विभागास जे कर्मचारी व वाहने लागतील देण्यात यावे. रोज किती कुत्र्यावर शस्त्रक्रिया होते रेकॉर्ड ठेवण्यात यावे. आज रोजी ज्या घटना घडतात ती परिस्थिती सुध्दा शासनाला केंद्र शासनाला निदर्शनास आणुन देण्याचे काम सर्वसाधारण सभेच्या माध्यमातुन केले जावे. १६ तारखेला बैठक होईल तेव्हा वेळ आहे. नागरिकांना, शाळकरी मुलांना कुत्र्यांचा त्रास होऊ नये. सर्वसाधारण सभेचा हा एक ठराव घेऊन याबाबत एक धोरण ठरवावे त्या धोरणा बाबत शासनाला कळवावे. कार्यवाही केली नाही तर कुत्र्यांची संख्या ही वाढतच जाणार आहे. |
| श्री.इरशाद खान | :घाटी रुग्णालयात जो मुलगा दाखल झाला आहे, सध्या त्याची पोजिशन काय आहे? |
| पशुसंवर्धन अधिकारी | :स्वत: घाटी रुग्णालयात जाऊन विचार पुस केली. त्या मुलास मोठया प्रकाराची मानेच्या वरती जखम झालेली होती. |
| श्री.इरशाद खान | :उपचारा करिता जे मेडीसन लागते ते मनपाने दिले पाहिजे असे मत घाटीने व्यक्त केले. सय्यद ऐतेशाम सय्यद हाशम यास मोकाट कुत्र्याने चावा घेतला त्यामूळे तो गंभीर जखमी असून घाटी दवाखान्यामध्ये औषधोपचार घेत आहे त्याची घरची आर्थीक परिस्थिती बरोबर नाही. त्याचे वडील मनपाच्या शाळेत खाजगी एजन्सी मार्फत काम करीत आहे.त्याचा ८-१० महिन्यापासून पगार होत नाही. मुलाच्या औषधोपचारासाठी लागणारा खर्च ते करू शकत नाही. औषधोपचारासाठी लागणारा खर्च महापालिकेने करावा. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :सन २००७ मध्ये जी कुत्र्यांची संख्या होती. त्यात आता किती वाढ झाली? महानगरपालिकेचा त्याच्यावर किती खर्च झाला आहे? |
| पशुसंवर्धन अधिकारी | :सन २००७ पासुन ते सन-२०१६ पर्यंत १८,००० कुत्र्यांचे ऑपरेशन केले. आणि त्यांच्यावर ९३ लाख रुपये खर्च झाले. Animal welfare board ला ५०% पैसे रिवर्स करुन देण्याचा प्रस्ताव पाठवलेला आहे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :इतके पैसे खर्च करुन सुध्दा कुत्र्यांची संख्या का वाढत आहे? |
| पशुसंवर्धन अधिकारी | :१००% कुत्रे पकडल्या जात नाही. त्यातील १०% पण कुत्रे सुटले की, ती मादी वर्षातुन दोन वेळा कुत्र्यांना जन्म देतात. ती संख्या वाढत जाते. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :महानगरपालिकेच्या तर्फे प्रत्येक रुग्णाला वैद्यकीय खर्च २० ते २५ हजार रुपयापर्यंत मदत केली पाहिजे. |
| श्री.जहाँगीर खान | :जागा घेण्यासाठी, औषधी उपलब्ध करुण देण्यासाठी तरतुद करावी. |
| श्री.अफसर खान | :डुकरांच्या बाबतीत काय उपाय योजना करणार आहे? |
| श्री. विकास जैन | :एका आठवड्यामध्ये ॲक्शन प्लॅन तयार करावा. शहरात प्राणी मित्र संस्था आहे. ते कुत्रे पकडु देत नाही. असे मला समजले. |

पशुसंवर्धन अधिकारी :Animal welfare board ने त्यांचे तीन चार स्वयंसेवक नेमलेले आहे. कुत्रे पकडण्याच्या जागेवर त्यांनी कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे सुचित केले. तक्रार आहे तो कुत्रा चावला मगच पकडण्यात यावे. सगळेच कुत्रे पकडु नका. असे त्या संस्थेचे म्हणणे आहे.

श्री.विकास जैन :मा.प्रशासनाला, पदअधिकाऱ्याला याची माहिती दिली आहे का?

पशुसंवर्धन अधिकारी :नियमानुसार कुत्रे पकडावे. असे त्यांचे म्हणणे आहे.

श्री.विकास जैन :एक अठवड्यामध्ये कशा प्रकारे किती कुत्रे पकडले जाते, विविध वार्डामध्ये काय काय नियोजन केले. ही माहिती स.पदाधिकारी गटनेते यांना द्यावी.

मा.महापौर :शहरामधले पिसाळलेले, मोकाट कुत्र्याची संख्या मोठी असतील त्यांच्या माध्यमातुन dog bit चे वाढते प्रमाण आहे आणि शासनाची कुत्रे पकडण्याची कडक नियमावली आणि महानगरपालिकेच्या सर्व स.सदस्यांच्या संतप्त भावना आहे. असे असतांना कुत्रे पकडणे, कुत्रे नियंत्रणात आणणे, वेळीच उपाय योजना करणे, याबाबत प्रशासनाचा हलगर्जीपणा, निष्काळजीपणा दिसुन येत आहे. शहरात जवळपास ४० हजार कुत्र्यांची संख्या आहे. कुत्रा पाळीव आहे, पिसाळलेला आहे, मोकाट आहे, हि वर्गवारी होत नाही. कुत्रा पिसाळलेला आहे, हे सदस्यांना निदर्शनास आणुन द्यावे लागते. ही बाब गंभीर पणे घेतली पाहिजे. आणि तात्काळ उपाय योजना केली पाहिजे. सर्वाच्याच वार्डामध्ये कुत्र्यांच्या बाबतीत सारखीच परिस्थिती आहे. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्याकरिता मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी येणाऱ्या आठ दिवसांमध्ये ॲक्शन प्लॅन तयार करा. Animla center करिता बांधकाम विभागाला पण सुचना देण्यात येते.ही संचिका मा.आयुक्तांची स्वाक्षरी घेऊन उपलब्ध ठेकेदारांकडुन ते बांधकाम ताबडतोब मार्गी लावण्यात यावे. ज्या ठिकाणी लाईट नसल्यामुळे काही प्रश्न उदभवलेले आहेत, त्याठिकाणी विद्युत दुरुस्ती करण्याचे काम करण्यात यावे. कर्मचारी, अधिकाऱ्यांची संख्या या विभागाचा जो प्रस्ताव असेल, ही सभा संपल्यानंतर लगेच संबंधीत अधिकारी श्री.नाईकवाडे, श्री.निकम, आणि प्रभारी आयुक्त श्री.भालसिंग याबाबत तात्काळ एक बैठक घेऊन आवश्यक कर्मचारी दयावे. मा.आयुक्त आल्यानंतर जे काही कर्मचारी अधिकारी द्यायचे आहेत त्या पध्दतीने त्यांची पोस्टींग करण्यात यावी. नऊ प्रभागामध्ये प्रभागनिहाय कुत्रे पकडण्याकरिता नियोजन करावे. प्रत्येक प्रभागात एक dog Van तसेच प्रशिक्षीत कर्मचारी आणि dog Van किमान दोन वार्डात एक तरी वाहन तात्काळ तांत्रिक विभागाने पाठवण्यात यावी. श्वान पकडण्यासाठी वाहनांची संख्या वाढवा. गाडी प्रत्येक ट्रिपला वाश बघण्याचे काम करावे, जेणे करुन कुत्रे पकडण्याची संख्या वाढेल. सकाळी ६ ते ९ आणि रात्री १० ते मध्यरात्री २ पर्यंत श्वान पकडण्याची मोहीम राबवण्यात यावी. पुर्वीपासुन लसीकरण

केले असते तर ही संख्या ४०,००० पर्यंत गेली नसती. कुत्रे पकडणे आणि त्यावर उपाय योजना करणे. त्या दृष्टिने पुण्याच्या ब्ल्यु क्रॉस या संस्थेला उद्याच मदतीसाठी बोलवून घ्यावे. स.सदस्यांनी डुक्करांचा सुध्दा एक महत्वाचा विषय मांडला आहे. त्याची संख्या वाढली आणि मोठ्या प्रमाणावर नागरिकांना त्रास होत आहे. ते पकडण्याकरिता जे नियम असतील त्यासदर्भात तज्ञांची मदत घ्यावी आणि त्यांच्या मालकाची बैठक घेऊन योग्य त्या सुचना देण्यात यावी. शासनाकडे प्रस्ताव पाठवायचा आहे, त्याची एक कमिटी तयार करा. स.पदाधिकारी गटनेते याचे समोर ठेवा. रस्त्यावर मास विक्री केली जाते, तो कचरा रस्त्यावर फेकला जातो त्यामुळे कुत्र्याची संख्या वाढलेली आहे. कुत्रा चावल्यानंतर जी ॲन्टीरिबीजची लस दिली जाते. घाटीच्या टीम बरोबर जाऊन चर्चा करावी. घाटी व मनपा यानी समन्वय करुन एक डॉक्टरांची टीम तयार करायची टीमच्या माध्यमातुन याच कामाकरिता उद्याच एक सेंटर चालु करावे. श्री.इरशाद खान यांनी सुचना केल्यानुसार सय्यद ऐतेशाम सय्यद हाशम यास मोकाट कुत्र्याने चावा घेतल्याने तो गंभीर जखमी आहे. तो सध्या घाटीत उपचार घेत आहे. त्या मुलाचे वडील महाराणा सेक्यूरीटीकडे कामाला आहे. त्याचा पगार दिला नाही. श्री.निकम यांनी संबंधीत एजन्सीला पगार देण्याची सुचना करावी. त्या मुलास अधिकच्या उपचारासाठी रु १००००/- मदत तातडीने दयावी. ि आणि भविष्यामध्ये अशा घटना होणार नाही, दखल घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :ज्या वार्डामध्ये सफाई कर्मचारी कमी आहे, त्याठिकाणी कर्मचारी देणे अवाश्यक आहे. आणि विद्युत मेंटेन्स एक तारखेपासुन बंद का आह?

मा.महापौर :स्वच्छतेच्या बाबतीत एक आराखडा तयार केलेला आहे. शहर स्वच्छ, हरित आणि सुंदर करण्याकरिता वेगळी मोहीम करत आहे. जे शंभर कर्मचारी घेतलेले आहे, त्यापैकी काही कर्मचारी वार्डात सुध्दा देण्यात यावे.

श्री.विकास एडके :मागील सभेत जे पाच नगरसेवक आमच्या पक्षाचे निलंबित केले, त्या निर्णयाच्या रुलिंगचा पक्षा तर्फे निषेध व्यक्त करतो. तशी नोद व्हावी.

श्री.कैलास गायकवाड :गौतम नगर येथील काही नागरीकांनी बौध्द विहाराच्या जागेवर अतिक्रमण केले. गेल्या आठ ते नऊ महिन्यापुर्वी तक्रार दिलेली होती. श्री.अकरम खान नावाच्या व्यक्तीने बौध्द विहाराच्या जागी मोठी भिंत बांधुन संपुर्ण रस्ता बंद केला. संबंधीत नागरिकांनी मा.महापौर व अतिक्रमण विभागाला तीन ते चार वेळेस पत्र व्यवहार केलेला आहे. ज्यावेळेस अधिकारी अतिक्रमाण काढण्यासाठी जातात, तेव्हा फक्त त्या व्यक्तीशी चर्चा करुन परत येतात. चर्चा करण्याचे कारण काय? भिमा कोरेगावमध्ये जी घटना घडली, त्या अनुषंगाने या प्रकरणात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकते.

अतिक्रमण विभागाने आता पर्यंत कार्यवाही का केली नाही? त्याचा खुलासा झाला पाहिजे.

श्री.अफसर खान :मोनाज हॉटेलच्या बाजुच्या गल्लीत दहा फिटचा रस्ता बंद केलेला अतिक्रमण केले. नियमीत मी सभागृहासमोर हा विषय मांडतो. कार्यवाही होत नाही.

मा.महापौर :अतिक्रमण विभागावर सहा तारखेला बरीच चर्चा झालेली आहे. फक्त या दोन विषयावर मर्यादित पणे खुलासे होतील.

कक्ष प्रमुख (दक्षता) :गौतम नगर, बौध्द विहाराच्या जागेवर जे काही अतिक्रमण केल्या असल्याच्या संबंधी सुचना मांडली त्या जागेची पाहणी आजच जाऊन करणार आहे. आणि त्या ठिकाणी अतिक्रमण असेल, तर विना विलंब कारवाई करण्यात येईल.

मा.महापौर :संध्याकाळच्या वेळेस अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरु केली होती, ती सुरु आहे का?

कक्ष प्रमुख (दक्षता) :दि.३१ डिसेंबर २०१७ पासुन महानगरपालिकेस जे पोलिस पथक प्राप्त होते, ते पथक आजपर्यंत आलेले नाही. त्यांचे म्हणणे आहे की, दुसऱ्या ठिकाणी नेमण्यात आलेले आहे. जो पर्यंत तिथुन रिलिव्ह होत नाही, तो पर्यंत महापालिकेत येणार नाही.

मा.महापौर :पथकाला बोलावुन घेण्यात यावे. आणि लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.विकास जैन :सहा तारखेला अतिक्रमणाच्या बाबतीत ज्या विषयावर चर्चा झाली. तिथले अतिक्रमण काढण्यात आले. परंतु तेथे पुन्हा जागेवर शेड बांधुन अतिक्रमण झाले आहे.

मा.महापौर :प्रत्यक्ष जाऊन पाहणी करुन कार्यवाही करावी.

श्रीमती.सीमा चक्रनारायण :काब्रानगर येथील नाल्यावरील अतिक्रमण अद्याप काढल्या गेलेले नाही.

मा.महापौर :अतिक्रमण विभागाचे जे प्रश्न असतील त्याचे लेखी पत्र माझ्या दालनात द्यावे. कार्यवाही करायला लावतो.

श्री.चेतन कांबळे :सन १९९३ पासुन साई मैदान, भावसिंगपुरा ते स्लाटर हौऊस जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावर अनेक लोकांनी अतिक्रमण केले. विद्यापीठाने सुध्दा अतिक्रमण केले. अतिक्रमण करणारे लोकांना महानगरपालिकेने मोबदला सुध्दा दिला. मा.सुप्रिम कोर्टात हे प्रकरण गेलेले आहे. डिसेंबर महिन्याच्या आत अतिक्रमण काढले जाईल असे म्हटले होते. अद्याप अतिक्रमण काढण्यात आले नाही.

मा.महापौर :श्री.काझी यांनी पाहणी करावी. कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती सरवत बेगम :दमडी महल भूमी अभिलेख कार्यालयाला लागुन जी १३,००० स्केअर फिट जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्या जागेवर पण शेड टाकुन अतिक्रमण केले आहे, ते अतिक्रमण काढण्यासाठी आदेश देण्यात यावे.

कुमारी.यशश्री बाखरीया :सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याच्या संदर्भात चर्चा झालेली होती. काहीच कार्यवाही झालेली नाही.

मा.महापौर :पुतळ्यांच्या विषयाबाबत मा.कलेक्टर यांनी संचिका घेऊन माझ्याकडे या मी ताबडतोब कार्यवाही करतो असे सांगितले होते. चार पाच पुतळ्यांचा विषय लवकर मार्गी लावण्यात यावा.

श्री.राजु शिंदे :१५० कोटी रुपयाचे डीपी रस्त्याचा कामाचा ठराव सर्वसाधारण सभेमध्ये घेतला होता. शहरातच १५० कोटीचे काम करत आहेत. त्याचे टेंडर सुध्दा दुसऱ्यांदा रिकॉलला आले. सातारा देवळाई करिता २५ कोटीचा ठराव घेण्यात आला. त्यानंतर मा.आयुक्त आणि शहर अभियंता यांना पत्र सुध्दा दिले. तेथील कामाचे अंदाजपत्रक अद्याप केले नाही. सातारा भागात स्मशान भुमिमध्ये लाईट बंद आहे. शहरामधील जुने लाईट पोल बसविणे, रिपेअरिंग असेल ते काम सुध्दा अद्याप झाले नाही.

मा.महापौर :सातारा स्मशान भुमि, कबरस्तान दोन्ही ठिकाणी विद्युत खांब उभे केले, त्यात ताबडतोब एलईडी लाईट लावण्यात यावे. देवळाईची स्मशान भुमिचे काम करण्यात यावे. एलईडी लाईट लावल्यानंतर ज्या जुन्या २८० फिटींग असतील त्याचा निर्णय घेतला, ते काम सुरु झाले नाही. कारण बाकीचे वायर, पाईप वगैरे लागणार आहे. मा.आयुक्तांची मंजुरी घेऊन त्या भागात फिटींग लावायला सुरुवात करावी.

कार्य. अभियंता (श्री.कोल्हे):साडे सतरा कोटीचे Estimate केले होते, तो वाढवुन घेणार आहे.

मा.महापौर :दोन दिवसामध्ये अंदाजपत्रक करुन निविदा प्रसिध्दीला पाठविले जावे. पाच कोटी सिडकोकडुन कमी आले आहेत, त्याचा पाठपुरावा करावा.

कार्यकारी अभियंता :सिडकोकडे पत्र दिले आहे.

श्री.राजु शिंदे :जे रस्ते करणार आहे, त्या अगोदर रस्त्याच्या खालून ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी.

मा.महापौर :रस्ते व ड्रेनेज लाईनचा एकत्र समावेश करण्यात यावा. दोन्ही एकत्र करुन त्या पध्दतीने निविदा करावी.

श्रीमती समिना शेख :गेल्या आडीच वर्षापासुन माझ्या वार्डातील शाळेचे काम पुर्ण झालेले नाही. लाईटचे, बोर्डचे, संगणक लॅबचे, मिटरचे काम पुर्ण झालेले नाही. मंगल कार्यालयामध्ये सुध्दा लाईट नाही.

श्री.गंगाधर ढगे :जुबली पार्क ते पानचक्की रस्त्यावरील रात्रीच्या वेळेस एक सुध्दा लाईट चालु राहात नाही.

श्रीमती.मुल्ला सलीमा बेगम:वार्डातील शाळेचे काम अडीच वर्षापासुन होत नाही.

उप अभियंता(विद्युत) :रेल्वेस्टेशन, हमालवाडा येथील ती नवीन शाळा आहे. ती फाईल निविदा अंतर्गत आहे. आठ लाखाचे ते काम आहे. दोन दिवसामध्ये निविदा काढुन ते पुढच्या आठवड्यामध्ये करण्यात येईल.

मा.महापौर :२६ जानेवारी पर्यंत त्या कामाचा शुभारंभ करण्यात यावा. शिक्षण अधिकारी यांनी सुचना दिली की संगणक आणि इतर जे विषय आहेत स.नगरसेविका यांचे बरोबर जाऊन शाळेच्या ज्या अडचणी असतील ते सोडवण्यात यावे.

श्री.कैलास गायकवाड :सातारा देवळाई महानगरपालिकेच्या हद्दीत आल्या नंतर सर्व नागरी सुविधा देणे बंधनकारक होते. या भागात सन २०१५-१६ ला पाणी पुरवठा करण्याच्या संदर्भात ठराव घेतला होता. आजच्या परिस्थितीमध्ये टँकरने पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी पर्यत्न करत आहोत. त्या भागातील सर्व विहीरी आटलेल्या आहेत, हातपंपाचे पाणी खोलवर आहे. ज्या एजन्सीला काम दिले होते, त्या एजन्सीच्या बाबतीत बऱ्याच तक्रारी प्राप्त आहेत. नागरीक पाण्याच्या बाबतीत तीन ते चार महिन्यापासुन श्री.चहल यांच्याकडे तक्रारी देत आहेत. नागरीक उपोषणाला बसलेले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, जे काही टँकरने पाणी उपलब्ध करुन देणार होते ते अजुन सुध्दा चालु झाले नाही. याबाबत पाणी पुरवठा विभागाकडून खुलासा देण्यात यावा.

उप अभियंता(पा.पु) :सातारा देवळाईमध्ये रोज दहा हजार लिटरचे तीन टँकरने पाणी पुरवठा करत आहोत. जे नागरीक पैसे भरतात त्यांना एक दिवसाआड दोनशे लिटरचा ड्रम भरुन देत असतो.

श्री.कैलास गायकवाड :एक ते दीड लाख लोक संख्या असतांना, त्यांना तीन पाण्याच्या टॅकरने पाणी देत असतो. एवढे पाणी कमी पडते.

मा.महापौर :स.सदस्यांबरोबर जाऊन, जे नागरीक उपोषणाला बसलेले आहेत, त्यांच्याशी चर्चा करुन त्यांचे काय म्हणणे आहे जानुन घ्यावे व अहवाल देण्यात यावा.

श्रीमती शोभा बुरांडे :बीड बायपास, संग्राम नगर ते कमल नयन बजाज हॉस्पीटल पर्यंत १५ दिवसापासुन रस्त्यातील लाईट बंद आहे.

मा.महापौर :विद्युत अभियंता यांनी पाहणी करावी काम तातडीने करावे. सभ अर्धा तासा साठी तहकुब करण्यात येते.

(सभा दुपारी ०२.०० वाजता तहकुब. पुन्हा सभा दुपारी ०३.०० वाजता सुरुवात)

मा.महापौर :स.सदस्य श्रीमती सरवत बेगम यांनी दमडी महल रस्त्यातील अतिक्रमण काढावे यासाठी मागणी केली श्रीराम पवार यांचे घर काढलेले आहे. ते सोडून बाजूला सीटी सर्व्हे कार्यालयालगत पत्र्याचे शेड लावले ते अतिक्रमण काढावे.

श्री.राजू शिंदे :दोन कर्मचारी सभागृहात नवीन दिसत आहे. कोणत्या विभागाकडून आले? त्यांची नियुक्ती कोणी केली?

मा.महापौर :इतिवृत्त नोंद घेणेसाठी स्टेनो कर्मचारी घेतलेले आहे.

नगरसचिव :नगरसचिव विभागासाठी स्टेनोची आवश्यकता होती आस्थापना विभागास वेळोवेळी स्टेनोची मागणी केलेली होती. इतिवृत्त वेळेवर तयार करण्यासाठी कामगार विभागाच्या मार्फत आऊट सोर्सींगवर स्टेनो कर्मचारी घेतलेले आहे.

उपआयुक्त (महसुल) :सभागृहात असलेले कर्मचारी आऊटसोर्सींगद्वारे महाराणा एजन्सीकडून घेतलेले आहे.

श्री.राजू शिंदे :एजन्सीकडून कोणते पदाचे कर्मचारी घेणार होते? शेडयुल कसे दिले? टेंडर कसे काढण्यात आले होते? त्याची माहिती दयावी.

उपआयुक्त (महसुल) :विविध पदाचे कर्मचारी आवश्यकतेनुसार लागणार त्यानुसार कार्यवाही केली यात वाहनचालक,सुरक्षा रक्षक,माळी व इतर पदाचा समावेश होता. आवश्यकतेनुसार भरती करण्यात यावे असे आहे.

श्री.राजू शिंदे :आवश्यकतेनुसार सिक्युरीटी ते उपआयुक्त ही पदे सुध्दा त्याच एजन्सीकडून भरणार आहे असाही अर्थ होतो.

उपआयुक्त (महसुल) :उपआयुक्त हे पद संविधानीक आहे.

मा.महापौर :एजन्सीचे अभियंता कसे ही वागणूक देत आहे. स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांचे वार्डातील एक टपरी उचलून आणली गजानन महाराज मंदीर जवळ त्यांनी ती रु.२०००/- घेऊन सोडून दिली. कारण काय या लोकांना प्रशिक्षण दिलेले नाही. फिल्डवरील कामाची माहिती नाही. महापालिकेच्या इंजिनिअर पेक्षा जास्त अधिकार त्यांना दिले गेले.

श्री.राजेंद्र जंजाळ :कर्मचाऱ्यांना ट्रेनींग दिले नाही, कोणते काम करायला पाहिजे, त्यावर कुणाचे कंट्रोल असणार आऊट सोर्सींगवर अभियंता घेतले त्यांना मनपाचे दुय्यम अवेक्षक काम सांगतात. माझे वार्डात महिला जे-ई ला लाईटचा सर्व्हेसाठी पाठविले त्यांचे बरोबर कुणीही नाही. याचा अर्थ मनपाचे कर्मचारी काम करीत नाही एजन्सीच्या लोकांना पाठविता. एजन्सीकडून कर्मचारी घेतले त्यांचेकडून काम करून घेण्याची पध्दत काय असायला पाहिजे ? धोरण निश्चित करावे.

श्री.राजू शिंदे :धूर फवारणी सदर्भात बैठक होती. तेथे एजन्सीचे कर्मचारी हजर होते. ते कर्मचारी आहेत हे सदस्यांना, आरोग्य अधिकारी यांना सुध्दा माहित नव्हते. अशा पध्दतीने काम होत असेल तर योग्य नाही त्यांचा पगार निघतो कसा यावर कोणाचे कंट्रोल आहे वार्डात लाईट चालू बंद करण्यासाठी एजन्सीचे कर्मचारी येतात आम्हाला माहीत नाही. कर्मचारी यांचे पगारापोटी त्या एजन्सीला किती पेमेंन्ट केले जाते.

उपआयुक्त (महसुल) :महाराणा सेक्युरीटी एजन्सीकडून ज्या विभागाची कर्मचारी देणेसाठी मागणी होते त्या विभागात कर्मचारी दिले जातात. त्यांचेकडून काम करून घेणे त्या विभागाची जबाबदारी आहे.

श्री.प्रमोद राठोड :मागणी कोण करते? कुणाची मान्यता घेतली जाते ?

उपआयुक्त (महसुल) :विभागाकडून मागणी येते. त्यानुसार मा.आयुक्तांची मान्यता घेऊन ते कर्मचारी त्या विभागात दिले जातात.

श्री.प्रमोद राठोड :श्री.चहल यांचे म्हणणे आहे की त्यांनी डिमांड न करता जे-ई पाठविले ते त्यांचे विभागात अतिरिक्त झाले.

कार्य.अभियंता-पापू :पाणीपुरवठा विभागात जे-ई देणेची मागणी न करता दिलेले आहे.

श्री.प्रमोद राठोड :मागणी न करता कर्मचारी देत असेल तर याचा अर्थ नुसते कागदोपत्री दाखवायचे व पगार दयायचा असा प्रकार चालू आहे मनपाच्या तिजोरीवर हा भार पडत आहे.

उपआयुक्त (महसुल) :ही बाब तपासावी लागेल.

मा.महापौर :मागणी न करता कर्मचारी दिले जातात. दोन्ही विभागाचा समन्वय असायला पाहिजे. कर्मचारी सलेक्शन करण्याची प्रोसेस असते १० पैकी १ उमेदवार पात्रतेनुसार निवड करायची असते. कामाचा अनुभव लक्षात

घेतला पाहिजे शासनाचे त्यासाठी नॉमस असतात. परंतु तसे होत नाही नाव आले की पोस्टींग दिली जाते हे योग्य नाही जे निकष घालून दिले त्याची अमंलबजावणी करणे आवश्यक होते.

श्री.राजू शिंदे :नियुक्ती करतांना त्यांचे निकष असतात. कुणाचेही नाव पाठविले तर कामावर घेणार असे होत असेल तर योग्य नाही. ज्याला घेतो त्याची शैक्षणिक पात्रता तपासली पाहिजे.

श्री.प्रमोद राठोड :डिमांड केल्यानंतर एजन्सीने नावे पाठविली पाहिजे त्यातून जो पात्र असेल त्यांची निवड प्रशासनाने करायला पाहिजे.

श्री.राजू शिंदे :टेंडर काढले त्यात नियम व अटी टाकल्या असेल, जेवढे लागेल तेवढे कर्मचारी संख्या दिल्यानंतर त्यानी दयावे असे टेंडर काढले का? माझे माहिती प्रमाणे यामध्ये मनपाचे अधिकारी भागीदार आहेत. एजन्सीच्या सर्व कामाची चौकशी करावी. एजन्सीला महापालिका दरमहा पगार करते. एजन्सी त्या लेबरला किती पेमेंन्ट देते ? सर्व माहिती समोर यावी.

उपआयुक्त (महसुल) :एकूण पेमेंन्ट किती देतो? हे सांगता येणार नाही. ि किती हजर व किती हजर झाले नाही? यानुसार जे हजर असतील त्यानुसार वेतन दिले जाते.

श्री.राजू शिंदे :ज्यांना क.अभियंता, दुय्यम अवेक्षक म्हणून घेतले त्यांचेकडून १-२ लाख कॅश काहीकडून चेकने घेतले व त्यांना ७-८ हजार रुपये पगार देत असेल तर तो कर्मचारी काहीही काम करू शकत नाही. नेमके ते पैसे कोणी घेतले?

उपआयुक्त (महसुल) :कर्मचाऱ्याची मागणी केली जाते. एजन्सीने त्यांचेकडून किती पैसे घेतले? तो त्यांचा विषय आहे.

मा.महापौर :त्या एजन्सीवर महापालिकेचे कंट्रोल असायला पाहिजे.

उपआयुक्त (महसुल) :या बाबतचे टेंडर मी या पदावर येण्यापूर्वी झालेले होते.

श्री.राजू शिंदे :टेंडर मागविले अटी शर्ती काय शेडयुल काय दिले होंते त्यानुसार कार्यवाही भरती होते का एजन्सी पैसे घेऊन नियुक्त्या देत असेल तर योग्य नाही या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी. कोणते कर्मचारी कोठे काम करतात. त्यांना किती पगार दिला जातो? एजन्सीला कोणत्या पदासाठी किती वेतन देतो? यावर नियत्रंण कोणाचे आहे? लाईट व इतर विकासासाठी पैसे नाही एकीकडे एजन्सीला १.२५ कोटी रूपये दरमहा दिले जाते हे योग्य नाही. एजन्सीला पैसे देऊन सुध्दा तो कर्मचारी यांना वेळेवर वेतन देत नाही. ४-४ तास कर्मचारी एजन्सीधारक यांचे घरासमोर पगारासाठी बसून ठेवतो.

श्रीमती संगिता वाघुले :लेबर लोकांचे ५-५ हजार डिपॉजीट ठेवले तीन महिने झाले पेमेंन्ट एजन्सी देत नाही.

मुख्य लेखाधिकारी :एजन्सीला दरमहा १.२० ते १.२५ कोटी पेमेन्ट देतो नोव्हेंबर २०१७ पर्यत पेमेन्ट केले कर्मचारी फिक्स पेमेन्टवर आहे परंतु कर्मचारी संख्या वाढत आहे.

मा.महापौर :आस्थापनेचा खर्च किती वाढला व मर्यादीत खर्च होत आहे का?

श्री.प्रमोद राठोड :एजन्सी नियुक्त केली व्यवसाय करीत आहे पैसे कमवित आहे एजन्सीला महापालिका पैसे देत असेल तर त्या कर्मचा-याचे पेमेन्ट सुध्दा एजन्सीने वेळेवर दिले पाहिजे.

श्री.राजू शिंदे :आम्ही कर्मचारी मागणी करतो तर कर्मचारी नाही असे सांगतात. महापालिका एजन्सीला पैसे देत आहे. जे आहे त्यांचे पगार एजन्सी करीत नाही तर ही रक्कम कुणाच्या घशात जात आहे.

मा.महापौर :कर्मचारी काम करतो त्यांचे खातेमध्ये आरटीजीएस नुसार पेमेंट जमा होणे अपेक्षीत आहे. त्यांनी आरटीजीएस सबमीट केल्यानंतर पुढील पेमेंट दयायला पाहिजे. अशी पध्दत असते. तसे येथे का करीत नाही?

श्री.राजू शिंदे :सदरील टेंडर रद्द करून रिकॉल करावे. पुन्हा टेंडर मागवावे. या पुढे जे कर्मचारी काम करतील त्यांचे खातेवर डायरेक्ट पगार जमा झाला पाहिजे अशी व्यवस्था करावी. कर्मचारी यांचेकडून डिपॉजीट ऐवजी त्यांची कागदपत्र एजन्सीचे ठेवून घेतले तर ठीक आहे. परत पैसे डिपॉजीट ठेऊन घेतात.

श्री.दिलीप थोरात :जे कर्मचारी भरती केले ते कुठे काम करतात ते तपासावे त्या कर्मचाऱ्यांचा किती उपयोग मनपाच्या कामासाठी होत आहे. हे सुध्दा तपासावे.

श्री.विकास जैन :किती कर्मचारी काम करतात? त्यांचा पगार किती? काय काम करतात ? सर्व यादी देण्यात यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :अनेक अधिकारी,कर्मचारी सेवानिवृत्त होत आहे त्यामूळे भविष्यात मनपाचे काम सुरळीत व्हावे यासाठी एजन्सीच्या मार्फत कर्मचारी घ्यावे असा ठराव घेतला होता. त्यानुसार एजन्सीला काम दिले याच एजन्सीचे मागे सुध्दा कमी कर्मचारी कार्यरत असतांना जास्त कर्मचारी दाखवून सुरक्षा विभागाचे अधिकारी यांचे सहया घेतल्या व त्यानुसार एजन्सीला २५-३० लाख जास्तीचे दिले गेले. याची चौकशी आयुक्तांनी लावली होती त्यावेळी सुरक्षा अधिकारी यांनी माझे सहया दबावाखाली आणून घेतल्या असे स्टेटमेन्ट दिले होते. त्याची सुध्दा चौकशी समोर यावी. मनपाचे नुकसान होत असेल तर त्या एजन्सीला पाठीशी घालू नये महाराणा एजन्सीने कर्मचारी यांचेकडून भरती करतांना पैसे घेतले. कर्मचारी कुणाचे नातेवाईक आहे सर्वांची यादी समोर यावी. या कर्मचाऱ्यांना सांगण्यात आले की, पुढील भरती होईल तेंव्हा तुम्हाला कायम स्वरूपी आदेश दिले जातील. ४-४ महिन्यापासून त्यांना पेमेन्ट नाही. जो पर्यत आकृती बंधास मान्यता होत नाही भरती करीत नाही तोपर्यत एजन्सीच्या माध्यमातून असे प्रकार होतच राहणार काय? एजन्सी कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर करीत नाही हे योग्य नाही. महाराणा असेल किंवा इतर एजन्सी असेल जर महापालिकेचे नुकसान होत असेल कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असेल तर त्या एजन्सीचा ठेका रद्द करावा.

श्रीमती संगिता वाघुले :महाराणा सेक्युरीटी एजन्सीकडून अधिकारी यांचे नातेवाईकच जास्त घेण्यात आले एजन्सीच्या कामाबाबत स्थायी समितीमध्ये अनेक वेळा

चर्चा झाली. आम्ही बचत गटाचे कर्मचारी कामावर घ्यावे सांगतो घेत नाही टॅक्स वसुलीसाठी कर्मचारी येतात ते .मनमानी पणे काम करीत आहे.या एजन्सीला काम देणे मध्ये मोठा भ्रष्टाचार झाला.गरीबांना कामावर घेणे ऐवजी श्रीमतांचे लोक एजन्सी घेत आहे.एजन्सीच्या संपूर्ण कामाची चौकशी व्हावी.

श्री.अफसर खान : जे कर्मचारी घेणार त्यासाठी जाहीरात देऊन त्यावर कमेटी नेमून निवड करणे आवश्यक असते तसा शासनाचा जी आर आहे. यापूर्वी अशा पध्दतीनेच कर्मचारी घेत होतो.कर्मचारी यांचेकडून एजन्सी पैसे घेत आहे.५० लक्षची बँक गॅरंटी आहे. २०-२५ हजार वेतनावर जाहिरात देऊन अभियंता घेऊ शकतो. अनेक विभागात एजन्सीच्या मार्फत वाजवीपेक्षा जास्त कर्मचारी दिले जाते तो खर्च वाढत आहे. एजन्सीला महापालिका दर महा १.२५ कोटी अदा करून सुध्दा एजन्सी त्या कर्मचा-यांना २-३ महिणे पगार देत नाही.पुर्वी ज्या पध्दतीने नियुक्ती दिली जात होती त्यानुसार नियुक्ती करावे.एजन्सीचा करारनामा रद्य करावा.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगावच्या शाळेवर चार कर्मचारी एजन्सीचे होते त्यांना अचानक काढून टाकले व त्याचा पगारही दिला नाही.

मा.महापौर :या शाळेत सेक्युरीटीची आवश्यकता आहे एजन्सी वाटेल तेव्हा कर्मचारी देईल त्यांना काढले हे योग्य नाही. महापालिकेचे एजन्सीवर नियत्रंण असायला पाहिजे.

श्री.मकरंद कुलकर्णी :नेहरूनगर बॉटनिकल गार्डनसाठी एक वर्षापासून सेक्युरीटी दिले नाही. जेथे आवश्यक नाही तेथे लेबर दिले.

श्री.अब्दुल नाईकवाडी :एजन्सीशी केलेला करारनामा तसेच जे टेंडर आलेले होते कोणाचे काय रेट होते त्याची प्रत तसेच एजन्सीने पीएफचे चलन भरल्याची प्रत देण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :अग्निशमन विभागात एजन्सीचे लोक दिले तो कर्मचारी सक्षम व त्याने ट्रेनिंग घेतले पाहिजे.जे कर्मचारी दिले त्यांची शारीरीक पात्रता व त्यात्या पदाच्या संबधीचा अभ्यासक्रम त्यांनी पुर्ण केला का याची विचारणा केली होती.तर ९० टक्के कर्मचा-यांचे प्रमाणपत्र एकाच कॉलेजचे आहे. अग्निशमन विभागामध्ये काम करणेसाठी जी शारीरीक पात्रता पाहिजे ती त्यांचेकडे आहेत का ?महाराणा एजन्सीने कर्मचारी दिले तेंव्हा महापालिकेने त्यांनी मुलाखत घेतली होती का ?ते कर्मचारी शारीरीक पात्रतेत बसत असेल तर त्यांना प्रत्यक्ष बोलवून विचारणा करावी.

मा.उपमहापौर :महाराणा एजन्सीने महापालिकेच्या नावाखाली या मूलाकडून नोकरीसाठी १, २ लाख घेऊन असे ७००-८०० मुले कामाला लावले त्या एजन्सीचा फोन लागत नाही.डॉग व्हॅन वर १० कर्मचारी एजन्सीकडून होते त्याचे पगार देत नाही म्हणून काम सोडून गेले. मनपा एजन्सीला रेग्यूलर पेमेंन्ट देते असे असतांना कर्मचायांना एजन्सी ४-४ महिणे पगार देत नाही. काही लोक कामावर नसतांना त्यांची

हजेरी जात आहे.या एजन्सीने फसवणूक केली आहे. एजन्सीच्या मार्फत नगररचना व झोन कार्यालयात कर्मचारी दिले त्यांना एकालाही अंदाजपत्रक तयार करता येत नाही. हे कर्मचारी घेतल्यानंतर वसुली असेल इतर उत्पन्न मनपास किती आले. रु.१.२५ कोटी दरमहा पगार एजन्सीला दिला जातो. आकृतीबंध बाबत काय झाले ?

श्री.विकास जैन :एजन्सीचे कर्मचारी वसुलीसाठी दिले परंतु वसुली पाहिजे तशी होत नाही कर्मचारी कुठे व कोणते काम करतात सदस्यांना माहित दिली नाही रेग्युलर अधिकारी यांनी त्या एजन्सीच्या कर्मचा-यावर काम सोपविले एजन्सीच्या अभियंत्यांना अंदाजपत्रक तयार करता येत नाही. ते कर्मचारी काम करू शकते की नाही शहानिशा केली नाही डायरेक्ट नाव दिले कामावर आले.या बाबत सर्व माहिती समोर यावी.

श्री.राजू शिंदे :एजन्सीला मनपाने पेमेन्ट केले एजन्सी पीएफ व ईएसआय जीएसटी भरतात का ?

मा.उपमहापौर :एजन्सीने पीएफ ईएसआय भरलेला नाही पुर्वीचे कर्मचारी यांचाही पीएफ भरला नाही.

श्री.विकास जैन :कर्मचाऱ्यांना पेमेन्ट वेळेवर देत नाही. तर पीएफ व ईएसआय भरत असतील असे वाटत नाही.

मा.महापौर :एजन्सी कर्मचा-याचे पीएफ, ईएसआय भरतात की नाही? कर्मचारी याची शारिरीक, शैक्षणिक पात्रता आहेत का? त्यांचे पगार का होत नाही? सर्व प्रकरणाची चौकशी मुख्य लेखापरिक्षक व शहर अभियंता व मुख्य लेखाधिकारी यांनी करावी. चौकशी अहवाल सादर करावा. आकृतीबंधाचा प्रस्ताव अंतिम झाला असता तर ही वेळ आली नसती. असे मत सदस्यांनी व्यक्त केले.

श्री.त्र्यंबक तुपे :एजन्सीने यापुर्वी सेक्युरीटी दिले होते बोगस बिले काढली. प्रकरण चौकशीसाठी होते तीही चौकशी अहवाल या बरोबर यावा. या प्रकरणात सुरक्षा अधिकारी यांनी स्वत:हून तक्रार केली होती की, आमच्या हजेरीवर दबाव आणून सह्या घेतल्या व एजन्सीला वाढीव रक्कम देण्यात आली.

उपआयुक्त (महसुल) :पुर्वीची चौकशी मुख्य लेखापरीक्षक यांचेकडे आहे.

श्री.राजू शिंदे :पुर्वीची चौकशी चालू असतांना पुन्हा याच एजन्सीला टेंडर कसे मिळाले?

विधी सल्लागार :पुर्वी जे सेक्युरीटी पुरवठा केले होते, त्या बाबतीत एक महिन्याचे जास्त पेमेन्ट दिले गेले. त्याची चौकशी मुख्य लेखापरीक्षक यांनी केली आहे. ते एक महिन्याचे ४-५ लक्ष रक्कम वळती करून घेण्यात आले.

मा.महापौर :पुर्वीची सेक्युरीटी भरती प्रकरणात जे जास्तीचे पेमेन्ट दिले गेले त्याचीही चौकशी या चौकशी बरोबरच सादर करावी.

श्री.प्रमोद राठोड :एजन्सीला एक महिन्याचे वेतन जास्त दिले गेले. एजन्सीने मान्य केले ते वळती करून घेतले परत त्याच एजन्सीला काम दिले. मनपाची फसवणूक झाली, ते सिध्द झाले व त्यांनी रक्कम भरणा केली तर तो निर्दोष होतो का पुन्हा त्याच एजन्सीला काम देता येते का ? त्यांनी

महापालिकेला फसविले आहे. गुन्हा दाखल करणे ऐवजी त्याला पुन्हा काम दिले गेले हे योग्य नाही.

श्री.अफसर खान :महाराणा एजन्सीचे काम काढून घ्यावे. नवीन टेंडर काढावे एखादया एजन्सीने फसवणूक केली तर काम देता येत नाही. या एजन्सीला का काम देण्यात आले?

मा.महापौर :चौकशी अहवाल आल्यानंतर कार्यवाही करता येईल.

श्री.नासेर सिध्दीकी :अनेक एजन्सीने मनपाची फसवणूक केली. स्पेक, समांतर, एलईडी असेल जेंव्हा करारनामा होतो सभागृहाला विश्वासात घेत नाही. एलईडीचा करारनामा प्रत मागीतला अद्याप दिला नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :पुर्वीची चौकशीत ती एजन्सी दोषी होती का? असे असेल तर पुन्हा काम कसे दिले?

मुख्य लेखा परीक्षक :यापूर्वी महाराणा सेक्युरीटी एजन्सीचे संदर्भात एक अहवाल दिला होता. ज्या अनियमीतता झाली ते अहवालात स्पष्ट केले होते. प्रत्येक विभाग प्रमुखाकडून सेक्युरीटीची मागणी होती. त्या मागणीच्या अनुषंगाने एजन्सीने देयक सादर केले होते. सेक्युरीटी गार्डचा पुरवठा झाला होता किंवा नाही त्या बाबतची हजेरी आढळून आली नव्हती. अहवालात दिले आहे. ऑगस्ट २०१४ या महिन्याचे दोन वेळेस वेतन दिले ते पण नमूद केले आहे.

श्री.राजू शिंदे :चौकशी यासाठी नेमतो की कोण दोषी आहे? किंवा नाही? ती एजन्सी दोषी होती की नाही?

मा.महापौर :या प्रकरणाची चौकशी करणेसाठी तीन सदस्यीय चौकशी समिती नेमलेली आहे या पूर्वीही चौकशी या एजन्सीची केलेली आहे त्या तो अहवाल माझेकडे पाठविण्यात यावा.

श्री.अफसर खान :जास्तीच्या हजेरी पाठवून २०-२५ लाख रुपये एजन्सीला देण्यात आले हा आरोप सिध्द होत आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :विभाग प्रमुखांकडून सुध्दा चुकीच्या पध्दतीने सादरीकरण झाले. ते सुध्दा दोषी आहे. एजन्सीने चुका केल्या महापालिकेचे नुकसान केलेले होते.

श्री.राजू शिंदे :एजन्सी दोषी असेल तर, पुन्हा टेंडर का दिले?

श्री.त्र्यंबक तुपे :विभाग प्रमुख सुध्दा दोषी आहे. एजन्सी दोषी होती तर टेंडर पुन्हा कसे दिले सर्व अहवाल समोर यावा.

मा.महापौर :चौकशी अहवाल माझेकडे सादर करावा.

श्रीमती माधुरी देशमुख :अनियमितता झाली म्हणजे चूक झाली की नाही?

मुख्य लेखा परीक्षक :अहवालामध्ये अनियमितता झाली. स्पष्ट दिले त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करणे अपेक्षीत होते.

मा.महापौर :अहवाल दिला आहे परंतु प्रशासनाने कार्यवाही का केली नाही?

श्रीमती माधुरी देशमुख :आऊट सोर्सींगवर जे कर्मचारी भरती केले त्यांची शैक्षणिक पात्रता काय आहे ? नाव व पदासह यादी दयावी. सहा.विधी अधिकारी पद सुध्दा भरले गेले आहे का?

विधी सल्लागार :जसे कुशल अकुशल तांत्रिक कर्मचारी भरण्यात आले त्यानुसार मा.कोर्टाच्या संबंधीत काम पाहण्यासाठी प्राची जैन यांची महाराणा एजन्सीकडून नियुक्ती केली आहे.

मा.महापौर :महाराणा एजन्सीला कर्मचारी पुरवठा करणे काम दिले या संपुर्ण प्रकरणात नियुक्ती, अर्हता असेल तसेच काम किती कर्मचारी घेणे बाबत कामे, कोणत्या पध्दतीने अटी शर्ती काय होत्या? पेमेन्ट देणेचे निकष काय होते? ज्या उद्देशाने काम दिले, त्या प्रमाणे होते का? यावर मनपाचे नियंत्रण असायला पाहिजे. यापुर्वी एजन्सीची चौकशी झाली एजन्सीवर समितीने चार्जेस लावावे, असे निर्देश दिले होते. त्याच एजन्सीला पूढे काम देतांना विचार का केला नाही. या एजन्सीच्या कामाचा एक संशय येथे निर्माण झालेला आहे. किती मर्यादेपर्यंत किती रक्कमेपर्यंत काम देऊ शकतो? किती लिमिटेशन असते? त्या चौकटीच्या बाहेर जाऊन काम द्यायचे असेल तर सक्षम सभागृहासमोर यावे लागते. या संपुर्ण प्रकरणाची शहर अभियंता, मुख्य लेखापरीक्षक व मुख्यलेखाधिकारी यांनी आठ दिवसात चौकशी करावी. मागच्या प्रकरणाची चौकशी चा अहवाल सुध्दा या बरोबर महापौराकडे सादर करावा. आरटीजीएस नुसार त्या लेंबरच्या नावावर पेमेंन्ट करण्याची सिस्टम आहे. एजन्सी कर्मचा-याकडून पैसे घेणे यावर मनपाचे नियत्रंण असायला पाहिजे. त्याची दखल प्रशासनाने घ्यावी.

श्रीमती समीना शेख :पुर्ण शहरासाठी समान पाणी वाटप करणार होते. आज जुन्या शहरात ६-७ दिवसा आड पाणी येते. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत चर्चा व निर्णय होतो. कार्यवाही होत नाही. आठ दिवसात नियोजन करावे

कार्य.अभियंता-पापू :समान पाणी वाटपासाठी प्रयत्न करण्यात आले आहे. हत्तेसिंगपूरा येथील टाकी १० वर्षापासून बंद होती ती चालू केली. शिवाजीनगरची टाकी चालू करीत आहे. दिल्लीगेट, ज्युब्लीपार्क व विश्वभारती कॉलनी या टाकीवर बुस्टर पंप बसविला सर्व प्रयत्न केले. जुन्या शहरात ५-६ दिवसा आड पाणी मिळत होते ते आता ३ दिवसा आड मिळत आहे. समान पाणी वाटपासाठी शहरात ३२ टाक्या बांधाव्या लागतील जायकवाडीतून येणारे १५६ एमएलडी पाणी लिमिटेड आहे त्यात वाढ होत नाही तोपर्यत समान पाणी ओल्ड सिटीसाठी देणे शक्य नाही.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी नियोजन करावे समान पाणी मिळेल याची दखल घ्यावी.

श्रीमती ज्योती मोरे :वार्डात आदर्श कॉलनी भागात दोन महिण्यापासून पाणी येत नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यानी या भागात व्हिजीट करुन योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.सय्यद मतीन :संबंधीत अधिकारी यांनी १५ दिवसात समान पाणी वाटप करू असे स्थायी समितीमध्ये आश्वासन दिले होते. आजही ६-७ दिवसाआड जुन्या शहरात पाणी येत आहे.या बाबतीत ठोस निर्णय घ्यावा.

श्री.जहागीर खान :वीस वर्षापूर्वी दररोज पाणी येत होते. आता आठ दिवसा आड पाणी येत आहे.समान पाणी देणे आवश्यक आहे.

मा.महापौर :पाणी देण्याचे नियोजन करावे तसेच जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यतच्या लाईनची पाहणी करणेसाठी सर्व पदाधिकारी,गट नेते यांचे समवेत पाहणी दौरा करणेसाठी प्रशासनाने आठ दिवसात नियोजन करावे. सत्यपरीस्थिती काय लक्षात येईल.पुर्वी एक दिवसा आड पाणी येत असे आता ७-८ दिवसा आड येत आहे.१३५ एमएलडी पाणी दररोज येते ते कुठे दिले जाते हर्सुल जेल मध्ये ही पाणी येत नाही तेथे ही शुध्द व मुबलक पाणी देण्या बाबत कार्यवाही करावी.

श्री.नितीन साळवी :लाईटच्या संचिकेवर सहया होत नाही.

श्री.दिलीप थोरात :लाईट मेंन्टनंसच्या कामे ठेकेदारानी बंद का केली.

शहर अभियंता :या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा झाली.वर्क ऑर्डरच्या संचिकावर दोन दिवसात निर्णय होईल काही कामाच्या संचिका तेथे काम करण्याची आवश्यकता आहे की नाही कार्य.अभियंता स्वतः बघून कार्यवाही करतील. मेन्टंन्सच्या कामासाठी त्या एजन्सीला ४ वेळेस मुदत दिली होती आता एजन्सीला मुदतवाढ देण्याचे पुन्हा विचाराधीन आहे.कालांतराने एलईडीचे काम सुरू होईल त्या नुसार कालातंराने मेंन्टन्सचे काम कमी होत जाणार आहे.

मा.महापौर :लाईट देखभाल दुरूस्तीची कामे तातडीने सुरू करण्यास ठेकेदारास सुचना दयाव्यात.

श्री.गोकुळसिंग मलके :नारेगावचा कचरा डेपो मध्ये कचरा येणे केंव्हा बंद होणार आहे.१६ तारखेला नागरीक गाडया बंद करणार आहे.तीन महिण्याची मुदत दिली होती.

मा.महापौर :जमा होणारा कच-याची विल्हेवाट कशी लावावी याची माहिती घेणेसाठी डीपी कुलकर्णी हे नवी मुंबई महापालिकेमध्ये असलेला प्रोजेक्ट बघायला गेले. प्रभाग निहाय एक प्रोसेसींग मशीन असे ९ प्रभागात नियोजन करण्याचा मानस आहे.

श्री.राजू शिंदे :नारेगाव येथे कचरा जाणार नाही त्यासाठी नियोजन करावे त्यानंतर वार्डातला कचरा वार्डातच जिरवला जाईल. यासाठी नियोजन करावे लागणार आहे. आतापर्यत प्रशासनाने काय कार्यवाही केली.

मा.महापौर :प्रभाग निहाय कचऱ्याचे प्रोसेसींग करण्या बाबत काय कार्यवाही केली. आडगावला जागा बघतो आहे. अशी बातमी आली आहे.

श्री.राजू शिंदे :सुरूवातीला ८-१० वार्डात प्रोसेसींग ट्रायल बेसवर मशीन बसवावे कचरा प्रोसेसींग सुरू करावे. माझे वार्डातही बसवावे. काही लोक पैसे देण्यास तयार आहे. पुन्हा नारेगावच्या नागरीकांनी कचरा येऊ नये यासाठी अंदोलन केले तर कोणीही तो प्रश्न सोडविण्यास येणार नाही.तीन महिण्यात महापालिका प्लॅनिंग करून कचरा तेथे जाणे बंद करणार होते अद्याप कार्यवाही केली नाही.

शहर अभियंता :या प्रकल्पाच्या कामासाठी डीपी कुलकर्णी नवी मुंबई येथे गेले आहे. दररोजचा जो कचरा जमा होतो त्यासाठी प्रत्येक प्रभाग निहाय एक प्रोसेसिंग मशिन ठेवणार ओला कचऱ्याचे कम्पोस्ट मध्ये रूपांतर करणार

व सुका कचऱ्यावर प्रक्रिया करणार आहोत. त्यासाठी कार्यवाही चालू आहे.

श्री.विकास जैन :डी.पी.कुलकर्णी येतील तेंव्हा महापौर दालनात आपल्या अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी. नवी मुंबई महापालिकेतील कचरा प्रोसेस प्लॅन कसा आहे काय पाहणी करून आले त्यावर चर्चा करून नियोजन करावे.

मा.अति.आयुक्त :ओला सुका कचरा वेगळा करून त्याच भागात त्यावर प्रक्रिया केली पाहिजे. त्यासाठी कॅम्पॅक सेंन्टरचे एक्सपॅन्चीगची परवानगी दिली आहे. ओला कचरासाठी कम्पोस्टीग मशीन आहे जे डी पी कुलकर्णी आणि तांत्रिक विभागाने बघीतली आहे.ते प्रत्येक झोन मध्ये एक मशीनस लावण्या बाबतचे नियोजन आहे निविदा लवकरच होईल.एका ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर लवकरच सुरू करतो आहे. २५ लक्षचे ते मशीन्स आहे कम्पोस्टींग करते.

मा.महापौर :दोन दिवसात महापौर दालनात या विषयी बैठक घेतली जाईल.

**<u>विषय क्रमांक १६९:-</u>** **(कार्यकारी अभियंता, जलनि:सारण प्रकल्प)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :याबाबत संक्षिप्त माहिती देण्यात यावी. टिपणी का दिली नाही.

कार्यकारी अभियंता(ड्रे) :प्रत्येक महीन्याच्या ५ तारखेला टिप्पणी दिली जाते. मागील सभा तहकुब झाली त्यामुळे टिप्पणी यात आली नाही.

श्री.राजु शिंदे :क्रिडाईचे जे शौचालय बांधले आहे, काम केले का?

कार्यकारी अभियंता(ड्रे) :त्या कामाचा आढावा घेतलेला आहे. आपल्या वार्डामध्ये पाहणी झाली आहे. सुरुवातीला कॉक्रीट रोड कट करण्याचे ते वेगळे नियोजन ठरवून तो सॉल केला. येत्या आठ दिवसात काम पुर्ण करुन देतो.

श्री.राजु शिंदे :ज्या नागरीकांनी शौचालय संदर्भात अर्ज दिले होते, त्यांना शौचालय देण्यात आले नाही. ज्यांनी शौचालय घेतले नाही, त्यांना उलट नोटीस देण्यात आली की, पोलीस केस का करण्यात येऊ नये. हे योग्य नाही.

कार्यकारी अभियंता(ड्रे) :वार्ड अधिकारी यांना सुचना केली की, तेथे जाऊन खात्री करुन कार्यवाही करतील.

श्री.राजु शिंदे :शौचालय देत नाही नुसते कागदावर प्रोसेस दाखवायची हे चुकीचे आहे. जो पर्यत मागिल शौचालयाची कामे होत नाही तो पर्यत हा विषय सभागृहा समोर येऊ नये.

मा.महापौर :महिलांसाठी शौचालय बांधुन द्यायचे आहेत. CSR च्या माध्यमातुन एजन्सीच्या लोकांना तयार करा. शौचालय संदर्भात स्थळ निश्चित केले, भुमिपुजन केले, ब्रिजखाली सुध्दा शौचालय ठेवता येऊ शकते, कोणाचीच काही अडचण नाही, मग या कामाला का गती देत नाही?

कार्यकारी अभियंता(ड्रे): ब्रीजखाली शौचालय करण्याचा निर्णय झाला. ॲटोफील्म वाले गाडया देणार त्यांना कोटेशन दिले कार्यवाही चालु आहे.

| | |
|---|---|
| श्री.अफसर खॉन | :पुर्वीपासून मी बोलतो माझ्या वार्डात शौचालय होत नाही. काम न होताच फंड न आल्याचे सांगत आहे. आज पर्यंत माझ्या वार्डात सहा महिन्यापासून कोणत्याच नागरीकाला लाभ मिळालेला नाही. |
| मा.महापौर | :शौचालयाचा प्रश्न किती दिवसामध्ये सुटणार आहे? |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :याद्या करण्याचे काम वार्ड अधिकारी मार्फत होते. चार महिन्यापासुन गव्हर्मेंटकडुन फंड आलेला नाही. |
| श्रीमती.संगिता वाघुले | :श्री.सिद्दीकी साहेब यांनी बैठक घेतली, पण अद्याप वार्डातले शौचालयाचा प्रश्न सोडवण्यात आलेला नाही. |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :सात शौचालयाचे काम सुरु केले. |
| श्री.अफसर खॉन | :माझे वार्डातला प्रश्न सोडवावा त्यानंतर या प्रस्तावास मंजुरी द्यावी. |
| मा.महापौर | :प्रत्येक सर्वसाधारण सभेमध्ये वार्ड अधिकारी आणि वार्ड इंजिनियर हजर असावेत. |
| श्रीमती.सुरेखा सानप | :अनेकांना दुसरा हप्त्याची रक्कम मिळाली नाही. |
| श्री.गोकुलसिंग मलके | :नारेगावमध्ये ३५ शौचालयात भांडे बसवण्यात आलेले नाही. ते किती दिवसात बसवणार आहे? |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :एक महीना वेळ लागेल. निधी उपलब्ध झाला की, लगेच काम होईल. |
| मा.महापौर | :ह्या सगळ्या कामासाठी किती वेळ लागणार आहे. तातडीने काम करावे. |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :एक महिन्यात हे सगळे काम होईल. |
| श्रीमती.संगिता वाघुले | :क्रिडाई एजन्सी काम करत नाही. अधिकारी यांचे ऐकत नाही. |
| मा.महापौर | :क्रिडाई काम करत नसतील तर दुसऱ्याकडुन काम पुर्ण करुन घेण्यात यावे. |
| श्री.गंगाधर ढगे | :एक वर्ष महिला शौचालयाचे उद्‌घाटन करुन झाले आहे. ते काम का होत नाही? |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :जुबली पार्कमध्ये कामाचे उद्‌घाटन केले होते, तेथे अक्षेप आलेला आहे. त्याच्यानंतर टाऊन हॉलमध्ये करण्यासाठी निर्णय घेतला T.P विभागाचा अभिप्राय घेतला जाईल. एक आठवड्यात त्यानंतर कामास सुरुवात होईल. |
| श्री.अफसर खॉन | :बिबि का मकबरा येथे पुर्ण जगातील पर्यटक येत असतात. तेथे शौचालय तातडीने करावे. |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :या कामासाठी टेंडर निघालेला आहे. ज्या एजन्सीला काम दिले आहे, सात महिन्यापासुन पाठपुरावा करतो. आठ दिवसात हे काम सुरु करण्यात येईल. |
| श्रीमती.सुरेखा सानप | :ज्या लोकांचे एक हप्ते बाकी आहे त्यांना पैसे कधी मिळणार? गरीब लोकांनाच देण्यासाठी निधी उपलब्ध नाही का? |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :सध्या फंड उपलब्ध नाही. शासनाला चार रिमांईडर दिले आहे. मी स्वतः शासनाकडे गेलो होतो. |

मा.महापौर :या सगळ्या विषयावर गंभीर पणे विचार केला पाहिजे. ज्या N.G.O ला काम दिले ते Pending आहेत, त्या सर्वांना महापौर ऑफिसमध्ये बोलावुन मिटिंगचे नियोजन केले जाईल.

कार्यकारी अभियंता(ड्रे) :N.G.O. ला आठ महिन्यापासून पेमेंट नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :महानगरपालिकेतील शौचालयामध्ये पाण्याची सुविधा असुन सुध्दा पाणी राहात नाही. या इमारतीमध्ये स्वतंत्र सुलभ शौचालय करण्यात यावे.

मा.महापौर :तात्काळ शौचालयामध्ये पाण्याची व्यवस्था करुन देण्याचे सांगावे. किमान सर्वसाधारण सभेच्या दिवशी तरी पाणी ठेवणे आवश्यक आहे. सभागृहाच्या बाजुला जिन्याच्या भिंती लगत एक शौचालय करण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :मनपा इमारतीतील शौचालय एजन्सीला किंवा बचत गटाला देऊन शौचालय स्वच्छ करण्यात यावे.

मा.महापौर :महापालिकेच्या इमारतीचे जे काही हाऊस किपींग, स्वच्छता, शौचालय, ऑफिस, कार्यालय हे हाऊस किपींगच्या माध्यमातुन देण्याचे आदेशीत केले होते. महाराणा एजन्सीला सोडुन एखाद्या अनुभवी एजन्सीकडुन हे काम करुन घेण्यात यावे. निविदाचे formet तयार आहेत. मा.आयुक्तांची सही घेऊन दोन दिवसामध्ये सगळ्या इमारती, त्यामध्ये शाळा, वार्ड कार्यालय, मुख्य इमारत, अग्निशामक विभाग, छ.शिवाजी महाराज संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, डॉ.अब्दुल कलाम रिसर्च सेंटर, ज्या इमारतीमध्ये पब्लिक वापर आहे, अशा सर्व इमारतींचा हाऊस किपींगच्या माध्यमातुन चांगले मेंटेन व्हावेत. दररोज स्वच्छता व्हावी. हे काम एकाच एजन्सीला न देता त्याची विभागुन टेंडर काढण्यात यावे. गरजु एजन्सीला काम द्यावे. विषय क्र.१६९ स.सदस्यांनी सुचना दिल्यात त्यांची तात्काळ अंमलबजावणी करावी. हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक १७०:-** **(युआयडीएसएसएमटी-मलनिःस्सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यैंत येतो की, केंद्र शासनाचे शहरी विङ्कास मंत्रालयाचे पत्र क्रं/के/१४०११/१५/२०१३-युडी-१ दिनांक २४ डिसेंबर २०१३ च्या Office Memorandum नुसार औरंगाबाद महानगरपालिङ्केच्या भुयारी गटार योजनेच्या रक्कम रुपये ३६७.६९ कोटीच्या प्रङ्कल्प प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे.सध्यस्थितीमध्ये शहरातील विविध भागात मलनिःसारण वाहीन्या टाकणे, ४ ठिकाणी २१६.०० द.ल.ली.क्षमतेचे (सुधारीत)मलजल प्रक्रिया केंद्र बांधणे व सिवेज पंपींग स्टेशन ची कामे सुरु आहे.प्रङ्कल्पाचे मक्तेदार मे.खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.आणि घारपुरे इंजिनियरिंग ॲन्ड कॅन्स.प्रा.लि(जेव्ही ) यांचे मार्फत प्रङ्कल्पैंतील विहीत कामे प्रगतीपथावर असुन या प्रङ्कल्पावर नियमित देखरेख करणे करीता

प्रङ्क ल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.फोट्रेस ॲडव्हायजरी सर्व्हिसेस मुंबई यांची नियुक्ती करण्यैंत आलेली आहे.

केंद्र शासनाच्या **लहान व मध्यम शहराच्या पायाभत सोयी-सुविधांचा विङ्क ास कार्यक्रम (uidssmt)** या योजने अंतर्गत केंद्र सरकारकडुन प्रकुण प्रङ्क ल्प ङ्कि मंतीच्या ८० टक्के म्हणजेच रुपये २९२.५७ कोटी तसेच राज्य शासनाकडुन एकुण प्रङ्क ल्प ङ्कि मंतीच्या १० टक्के म्हणजेच रुपये ३६.५७ कोटी असे एकुण रक्कम रुपये ३२९.१२ कोटी अनुदान स्वरुपैंत महानगरपालिङ्के स मिळण्याचे प्रस्तावित होते.तसेच या अंतर्गत उर्वरीत १० टक्के रक्कम रुपये ३६.५७ कोटीची तजविज महानगरपालिङ्के स करावी लागणार होती.

केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी या योजनेच्या ऑथक वर्ष सन २०१३-१४ अंतर्गत नगरपरीषद प्रशासन संचालनालय मुंबई चे आयुक्त तथा संचालङ्क , यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस/युआयडीएसएसएमटी/औरंगाबाद/मनपा/संक्र/३९५६/२०१४/कक्ष/१३ दिनांक २० मे २०१४ अन्वये औरंगाबाद महानगरपालिङ्के स खालील नुसारचे केंद्र व राज्य शासना कडील अनुदान प्राप्त झालेले आहे.

| एकुण मंजुर प्रङ्क ल्प ङ्कि मेंत | केंद्र शासन | राज्य शासन | केंद्र व राज्य शासन एकुण अनुदान |
|---|---|---|---|
| **रु. ३६५.६८८९ कोटी** | **रु. १४६.२७५६ कोटी** | **रु. १८.२८४४ कोटी** | **रु. १६४.५६ कोटी** |

परंतु केंद्र शासनाने माहे जुन २०१५ अंतर्गत अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) योजना सुरु केलेली आहे. महानगरपालिकेची मंजुर मलनिःसारण योजना ही (Transition Phase) मधिल असल्याने महानगरपालिङ्के च्या या योजनेचा समावेश अमत या नविन योजने अंतर्गत केंद्र शासनाने केलेला आहे.अमत योजनेच्या वित्तीय आकृतीबंधामुळे महानगरपालिङ्के स खालील नुसारचे सुधारीत ऑथक अनुदान प्राप्त होणार आहे.

| एकुण मंजुर प्रङ्क ल्प ङ्कि मेंत | केंद्र शासन हिस्सा (एकुण प्रङ्क ल्प ङ्कि मंतीच्या ६० टक्के) | राज्य शासन हिस्सा (एकुण प्रङ्क ल्प ङ्कि मंतीच्या २० टक्के) | महानगरपालिकेचा हिस्सा (एकुण प्रङ्क ल्प ङ्कि मंतीच्या २० टक्के. |
|---|---|---|---|
| रुपये ३६५.६८८९ कोटी. | रुपये २१९.४१३३४ कोटी | रुपये ७३.१३७७८ कोटी | रुपये ७३.१३७७८ कोटी |

अमत या योजने अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाकडुन एङ्क त्रित रुपये २९२.५५११२ कोटीचे उक्त नुसारचे सुधारीत अनुदान महानगरपालिङ्के स प्राप्त होणार आहे. महानगरपालिङ्के स केंद्र शासनाकडुन या अंतर्गत यापुर्वीच रुपये १४६.२७५८ कोटी अनुदान या यैंजनेत मिळालेले आहे.म्हणजेच या प्रङ्क ल्पा करीता अमत या यैंजनेतुन उर्वरीत फक्त रुपये १४६.२७५३२ कोटी अनुदान मिळणार आहे.तसेच उर्वरीत रुपये ७३.१३७७८ कोटी महानगरपालिङ्के स भरणा करावे लागणार आहे.महानगरपालिङ्के ने या अंतर्गत यापुर्वीच रुपये १८.२८ कोटी प्रङ्क ल्प करीता उघडण्यैंत आलेल्या स्वतंत्र बँक खात्या अंतर्गत जमा केलेले आहे.**त्यामुळे महानगरपालिङ्के स उर्वरीत रुपये ५४.८५७७८ कोटीची ऑथक तजविज करावी लागणार आहे.**

तसेच सदर प्रङ्क ल्प करीता रक्कम रुपये ३५५.०४ कोटीची निविदा सुचना प्रसिध्द करुन रितसर कार्यवाही अंती प्रङ्क ल्पाचे मक्तेदार म्हणुन मे.खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.आणि घारपुरे इंजिनियरिंग ॲन्ड केन्स.प्रा.लि (जेव्ही) यांच्या रुपये ४६४.०० कोटीच्या निविदा दरास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २३१ दिनांक २९.४.२०१४ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.त्यामुळे महानगरपालिङ्के स निविदा दरा मधील फरक रुपये १०८.९६ कोटीची अतिरिक्त ऑथक तरतुद करावी लागणार आहे.परंतु या अंतर्गत मुळ मंजुर प्रङ्क ल्प ङ्कि मेंत रुपये ३६५.६९

कोटी असल्याने **रुपये ९८.३१ कोटीचीच अतिरीक्त ऑथक तजविज प्रद्ब ल्प करीता आवश्यद्ब आहे.**

महानगरपालिद्बे स <u>सदरील मलनिःसारण प्रद्ब ल्प पुर्ण करणे करीता उक्त रुपये</u> ५४.८५७७८ <u>कोटीच्या रक्कमेचे तसेच निविदा दरा मधील फरका करीता रु.९८.३१ कोटी असे एद्ब त्रित रुपये १५३.१६७७८ कोटीचे ऑथक नियोजन करणे आवश्यद्ब आहे.</u>

मा.आयुक्त तथा संचालद्ब ,नगरपरीषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे कडे दिनांक १.९.२०१६ रोजी आयोजीत विशेष बैठकी अंतर्गत कर्ज उभारणी करीता शासन पत्र क्रमांक/संकिर्ण-१००७/कर्ज व्यवस्थापन प.क्रं/३४५/नवि-२६.दिनांक १७ डिसेंबर २००७ नुसार आवश्यद्ब असणारी माहिती /वित्तीय आकृतीबंध शासनास सादर करण्यैंत आलेला आहे.या अंतर्गत रुपये ५४.८५७७८ कोटीची तजविज औरंगाबाद महानगरपालिद्बेच्या महसुली उत्पन्नातुन करण्यैंत येणार आहे.तसेच उर्वरीत रुपये ९८.३१ कोटी हुडको या वित्तीय संस्थेकडुन घेण्याचे नियोजन आहे.

**महानगरपालिद्बे स** हुडको या वित्तीय संस्थेने महाराष्ट्र सुवर्ण जयेंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत शासनास सादर करण्यैंत आलेल्या मलनिःसारण प्रद्ब ल्प करीता रक्कम रुपये १९२.०९ कोटी वार्षिद्ब १०.७५ टक्के व्याज दराने (floating) कर्ज स्वरुपैंत देण्यास त्यांचे कडील विहीत अटी व शर्तीन्वये यापुर्वीच दिनांक ११ डिसेंबर २०११ अन्वये मंजुरी दिलेली आहे.हुडको या संस्थेकडुन कर्ज घेणे संदर्भाने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७१ दिनांक १७.१२.२०१२ अन्वयेही मंजुरी मिळालेली आहे.परंतु तदनंतर सदरील प्रद्ब ल्प महाराष्ट्र सुवर्ण जयेंती नगरोत्थान महाअभियान ऐवजी केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी या योजने अंतर्गत मंजुर झालेला असल्याने तसेच या यैंजनेतील सुधारीत वित्तीय अनुदानाच्या अनुषंगाने महानगरपालिद्बे स फक्त रुपये ३६.५७ कोटीची आवश्यद्बता होती.त्यामुळे कर्ज घेणे बाबतचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यैंत आलेला होता.

परंतु सदरील प्रद्ब ल्प हा अमत अभियान अंतर्गत समाविष्ठ झालेला असल्याने या यैंजनेतील वित्तीय आकृती बंधाच्या अनुषंगाने सध्यस्थितीत प्रद्ब ल्पैंतील विहीत उपांगे पुर्ण करणे करीता महानगरपालिद्बेच्या हिस्सा व्यैंतरिक्त रुपये ९८.३१ कोटी कर्ज स्वरुपैंत घेणे आवश्यद्ब आहे.

सदरील प्रद्ब ल्प अंतर्गत झालेल्या कामां करीता प्रद्ब ल्पाचे मक्तेदार यांना आजपावेतो रक्कम रुपये १८२.३५ कोटी अदा करण्यैंत आलेले आहे.अमत या यैंजनेतील विहीत मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने यैंजनेत झालेल्या कामाचे उपयोगीता प्रमाणपत्रही राज्य शासनास सादर करण्यैंत आलेले आहे.तसेच महानगरपालिद्बे स यैंजनेतील दुस-या हप्त्याचे ऑथक अनुदान उपलब्ध करुन देणे बाबतही शासनास पत्र क्रं/मनपा/युआयडीएसएसएमटी/मलनिःसारण प्रद्ब ल्प/२०१६/५२७ दिनांक १.८.२०१६ अन्वये विनंती करण्यैंत आलेली आहे.

महानगरपालिद्बेने मलनिःसारण प्रद्ब ल्प करीता हुडको कार्यालयास सादर केलेल्या कर्ज प्रस्तावास हुडको कार्यालयाने विहीत अटी व शर्तीसह त्यांचे कडील पत्र क्रं/एच/एमआरओ/औरंगाबाद/एमसी/२०१६६/२०१२/एल/३१८५ दिनांक ११ डिसेंबर २०१२ अट क्रं. १ ते ११ (ADDITIONAL SANCTION CONDITIONS REFERRED TO IN PARA 11 OF LOAN SANCTION LETTER) अन्वये मंजुरी दिलेली होती.परंतु महानगरपालिद्बेने कर्ज प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवल्याने हुडको या संस्थेने दिनांक १५.४.२०१३ अन्वये महानगरपालिद्बेचे कर्ज प्रस्ताव प्रद्ब रण बंद केलेले होते.

<u>**हुडको कार्यालया कडील अटी व शर्तीनुसार त्यांना एकुण कर्ज द्बिमंतीच्या १२५ टक्क्े पयैतच्या रक्कमेची मालमत्ता तारण ठेवणे आहे.या करीता रुपये ९८.३१ कोटीच्या कर्ज रक्कमे करीता रुपये १२२.८९ कोटीच्या मालमत्ता तारण ठेवाव्या लागणार आहे.**</u> हुडको या संस्थेचे श्री.अजित कमार के यांचे कडील पत्र क्रं/एच/एमआरओ/हुडको/औरंगाबाद महानगरपालिद्बा/२०१६६/१५५९ दिनांक ९ सप्टेंबर २०१६ रोजीच्या पत्रान्वये <u>**हुडको या संस्थेने**</u>

**<u>सदरील प्रकल्प प्रस्ताव करीता ९.९५ टक्के (fixed) प्रति वर्ष दराने कर्ज देण्यात येणार असल्याबाबत कळविलेले आहे.या संदर्भाने यापुर्वी दिलेल्या हुडको कर्ज प्रस्ताव संदर्भाने सविस्तर माहिती विहीत प्रस्तावा सोबत सादर करणे बाबत सुचित केलेले आहे.</u>**

हुडकोने महानगरपालिकेस कर्ज प्रस्ताव अंतर्गत Audited accounts of Aurangabad Municipal corporation from fy 2013-14/2014-15, Lastest physical and financial progress of the scheme, Resolution for obtaining loan from Hudco, Credit Rating done by the agency (if any), List of properties for mortagage with Survey No.and approximate Valuation , Revised Detailed project Report इत्यादी बाबींची पर्तता करणे बाबत कळविलेले आहे. हुडको या संस्थेकडील विहीत अटी व शर्तीच्या अनुषंगाने हुडको कडुन रुपये ९८.३१ कोटीचे कर्ज घेण्यास राज्य शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ वर्षात रु.५२९.७३ कोटी, सन २०१४-१५ वर्षात ४१२.४२ कोटी व सन २०१५-१६ वर्षात रु.४९५.७० कोटी, प्रत्यक्ष महसुली व भांडवली जमेचा विचार करता सन २०१६-१७ व सन २०१७-१८ ची अपेक्षीत जमा अनुक्रमे रु.५९५.०० कोटी व रु.६९५.०० कोटीपर्यंत होऊ शकेल. अशा परिस्थितीत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वैधानिक व बांधील खर्चापोटी अपेक्षीत रक्कम ५४६.०० कोटी ज्यामध्ये सन २०१६-२०१७ या वर्षातील अपुर्ण राहणारी कामे जी की, सन २०१७-१८ मध्ये दायित्वापोटी स्पिल स्वरुपात पुढे येणार, अशा कामासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीचा समावेश नाही. सन २०१७-१८ मध्ये हाती घ्यावयाच्या विकास कामांचा आढावा सुध्दा यासाठी घेणे अनिवार्य आहे. अन्यथा अत्यावश्यक विकास कामासाठी आर्थिक तरतुद करणे जिकीरीचे होऊ शकेल.

वरील सर्व वस्तुस्थिती मा.महासभेच्या निर्दशनास आणून देऊन युआयडीएसएसएमटी अंतर्गत सुरू असलेली योजना पुर्ण करण्यासाठी उभ्या करावयाच्या कर्जावर निर्णय घेणेबाबत विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. रु.९८.३१ कोटी कर्ज घेतल्यानंतर सन २०१७-१८ च्या बांधील खर्चात रु.२१.०० कोटी वाढ होईल. ज्याचा समावेश वरील अपेक्षीत बांधील खर्चात करण्यात आलेला नाही.

त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या उक्त मलनिःसारण प्रकल्पातील विविध उपांगातील कामे विहीत कालावधीत पुर्ण करणे करीता हुडको या वित्तीय संस्थेकडुन ९.९५ टक्के (fixed) प्रति वर्ष दराने कर्ज घेणे, हुडको या संस्थेकडुन कर्ज घेण्यास राज्य शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे,हुडको या वित्तीय संस्थेकडील विहीत अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे, हुडको कार्यालया कडील अटी व शर्तीनुसार त्यांना एकुण कर्ज किमंतीच्या १२५ टक्के पर्यंतच्या रक्कमेच्या मालमत्ता तारण ठेवणे संदर्भाने कार्यवाही करणे करीता आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :हा प्रस्ताव ९८ कोटीचा कर्ज घ्यायचा जरी असला तरी, कर्ज ५२ कोटी कामाला लागणार आहे. उर्वरित काम भुमिगत गटार योजनेतुन ५२ कोटी लागणार आहे.

श्री.राजु शिंदे :याबाबत काही प्रश्न विचारायचे आहे त्यासाठी त्यांना समोर बोलावण्यात यावे.

मा.महापौर :सभागृह जे मत मांडेल त्या अनुषंगाने योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.नासेर सिद्दीकी :पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन नुसार माहिती द्यावी. खर्च किती झाला कोणत्या कामासाठी झाला माहिती द्यावी.

श्री.राजु शिंदे :योजना किती कोटीची होती आणि ती कशी केली? केंद्र सरकारचे राज्य सरकारचे किती निधी येणार होते, मनपाचा हिस्सा कसा होता. हे सविस्तर सांगण्यात यावे.

| | |
|---|---|
| श्री.विकास एडके | :याच्यासाठी एक विषेश सर्वसाधारण सभा घेण्यात यावी. ३२९ कोटी आलेले सीटी मध्ये कोणते काम केले. पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशन नुसार दाखवावे. |
| श्रीमती सरवत बेगत | :या योजने अंतर्गत शासनाकडुन ४०० कोटी रुपये आले आहेत. ते कुठे खर्च झाले आणि जी आता या नुसार १०० कोटी रुपयाची मागणी केली हा सर्व ते कुठे आणि कधी खर्च केले जाईल याची पुर्ण माहिती प्रोजेक्टरवर देण्यात यावी. |
| मा.महापौर | :या संपुर्ण योजनेच सुरुवातीपासून ते आतापर्यंतचे काम प्रस्ताव ठेवल्याप्रमाणे संक्षिप्त माहिती देण्यात यावी. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :यामध्ये महानगरपालिकेची मालमत्ता गहाण ठेवण्याचे नमुद आहे. मनपाच्या एकुण मालमत्ता, गहाण ठेवलेल्या मालमत्ता आणि महापालिकेकडे राहिलेली मालमत्ता याचा पुर्ण खुलासा द्यावा. महापालिकेच्या कुठल्या कुठल्या जागा यापुर्वी तारण ठेवलेल्या आहेत, कर्ज काढण्याचे Planing चालु आहे. त्यामध्ये महापालिकेचे उत्पन्न वाढवुन येणाऱ्या बजेटमध्ये तरतुद करावी. परंतु कर्ज घेण्यात येऊ नये. |
| श्री.राजु शिंदे | :कर्ज काढण्याची आवश्यकता नाही. याला बजेटमध्ये तरतुद करण्याची पण आवश्यकता नाही. यामध्ये पैसे किती आले, खर्च किती झाला, काम किती झाले, त्यानंतर पैसे येणार होते ते काम थांबले, किती व्याज मिळाले? शासनाचा निधी कुठे खर्च झाला माहिती द्यावी. |
| मा.महापौर | :चर्चेला सुरुवात करायची असेल तर हा विषय पुर्ण संपल्यावरच पुढचे विषय घेता येईल. |
| श्री.अफसर खॉन | :सविस्तर माहितीसह पुढच्या बैठकीत हा विषय घेण्यात यावा. ८०% कुठे काम झाले. |
| | (यावेळी अनेक सदस्य सभा तहकुब करण्याचे बोलतात) |
| श्री.गंगाधर ढगे | :हा विषय मोठा आहे. विषेश सभा घेण्यात यावी. |
| श्री.विकास एडके | :जी मालमत्ता गहाण ठेवत आहे ती मनपाची आहेत का? |
| मा.महापौर | :स.सदस्यांची सहमती असेल तरच हा विषय घेण्यात येईल. महानगरपालिकेचे प्रमाणपत्र, मालमत्तेची वेगळी यादी ज्यांचे मॉडगेज झालेल्या आडगळीच्या मालमत्ता त्याचे मुल्यमापन प्रमाणपत्र त्यांची माहिती, मालमत्तेची सगळी माहिती, महानगरपालिकेवर कर्ज किती आहे, खर्च किती, अपेक्षित उत्पन्न किती हे अकांऊटशी रिलेटेड ज्या बाबी आहेत या सगळ्यांची माहिती आणि मालमत्ता विभागाचे श्री.कोल्हे यांनी ज्या महत्वाच्या मालमत्ता व ज्या अडगळीत पडलेल्या मालमत्ता आहेत त्याची सुध्दा माहिती देण्यात यावी. |
| श्री.विकास जैन | :विषय मोठा आहे नंतर घ्यावा. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :या विषयावर आम्हाला सुध्दा चर्चा करायची आहे. या विषयास स्थगिती देण्यात यावी. |
| श्रीमती.समीना शेख | :सभा तहकुब करावी. |

मा.महापौर :२० व २२ तारखेच्या दरम्यान २६ तारखेच्या आधी या विषयाच्या अनुषंगाने संपुर्ण माहिती पावर पॉईन्ट प्रेझेंटेशननुसार दाखविण्यात येईल व प्रोजेक्टवरवर झालेला अपेक्षित खर्च, झालेल्या कामाची संपुर्ण प्रकल्पाच्या बाबतीत जी काही माहिती असेल ती पुढच्या बैठकीत देण्यात यावी सभा तहकुब करण्यात येते.

याच बरोबर राष्ट्रगीताने सभा संपविण्यात आली.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद